**सुविचार**
आपकी नियन्त्रण – शक्ति इतनी सशक्त होनी चाहिए कि एक समय में आपके मन में सिर्फ वहीं संकल्प उत्पन्न हों जो आप चाहते हैं, न अधिक और न कम ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/ रविवार दि. १४ जूलै २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१५० ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

# ‘मुंबईला जगाची आर्थिक राजधानी बनविण्याचे माझे स्वप्न’

मुंबई : महाराष्ट्राकडे गौरवशाली इतिहास आहे, शक्तीशाली वर्तमान आणि समृद्ध भविष्याचे स्वप्न आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून जगाची आर्थिक राजधानी बनविण्याचे माझे स्वप्न आहे. त्यास जगाची आर्थिक कॅपिटल बनवण्याचे माझे स्वप्न आहे. महाराष्ट्राकडे गौरवशाली इतिहास, समृद्ध भविष्य आणि कृषी क्षेत्राची क्षमता आहे. एनडीए सरकारचे स्थिरता देऊ शकते हे लोकांना माहिती आहे. तिसऱ्या टर्ममध्ये एनडीए सरकार तीन पटीने अधिक काम करणार असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे.



लोकसभेच्या निवडणूक निकालानंतर पहिल्यांदाच पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी महाराष्ट्र दौऱ्यावर आले. या दौऱ्यादरम्यान राजधानी मुंबईतील पूर्व आणि पश्र्चिम उपनगरांना जोडणाऱ्या महत्वाकांक्षी गोरेगाव–मुलुंड जोड रस्ता प्रकल्प (तिसरा टप्पा) अंतर्गत संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून जाणाऱ्या जुळा बोगद्याच्या कामाचे भूमिपूजन नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले. यावेळी त्यांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधला. यावेळी मोदी यांनी मुंबईकरांना मराठीतून नमस्कार म्हणत आपल्या भाषणाला सुरूवात केली. यावेळी त्यांनी वारकऱ्यांना वारीच्या शुभेच्छाही दिल्या. गोरेगाव येथील नेस्को एक्झिबिशन सेंटर येथे हा सोहळा पार पडला. यावेळी तब्बल ३० हजार कोटींच्या प्रकल्पांचे लोकार्पण आणि भूमिपूजन मोदींच्या हस्ते झाले.

**विविध योजनांची दिली पंतप्रधानांना माहिती**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी पंतप्रधानांचे स्वागत केले. यावेळी, उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस यांच्यानंतर मुख्यमंत्री शिंदेंनीही भाषण करत राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या समन्वयाने होत असलेल्या विकासकामांची माहिती दिली. तर, राज्य सरकारकडून राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची (पान २ वर)

# रेशनकार्ड धारकांसाठी आनंदवार्ता
## गणेशोत्सवात मिळणार ‘आनंदाचा शिधा’

पुणे : राज्यातील रेशनकार्ड धारकांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वर्षाच्या सुरुवातीला झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्रातील रेशनकार्ड धारक सर्व नागरिकांना ‘आनंदाचा शिधा’ वाटप करण्यात येणार असा ठराव मांडला होता. त्यानुसार ११मार्च रोजी राज्य मंत्रिमंडळाच्या पार पडलेल्या बैठकीत गुढीपाडवा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त ‘आनंदाचा शिधा’ वितरणाचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर आता गणेशोत्सवातही राज्य सरकारकडून आनंदाचा शिधा वाटप करण्यात येणार आहे. त्यामुळे शिधापत्रिका धारक नागरिकांचा यंदाचा गणेशोत्सव




आणखी उत्साहदायक होणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राज्य सरकार गणेशोत्सवात ५६० कोटींचा आनंदाचा शिधा वाटणार आहे. याबाबत ऋराज्य सरकारकडून जीआर प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यानुसार तब्बल १ कोटी ७० लाखांहून अधिक शिधापत्रिका धारकांना याचा लाभ मिळणार आहे. या वाटपासाठी निविदा प्रक्रिया २१ ऐवजी ८ दिवसांत पूर्ण करणार आहेत, अशी माहिती मिळत आहे.

**आनंदाच्या शिध्यात मिळणार या गोष्टी**

गणेशोत्सवातील आनंदाचा शिधा वाटप हा १५ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२४ याकाळात होणार आहे. या शिध्याच्या प्रत्येक संच रूपये शंभरप्रमाणे सवलतीच्या दरात वितरीत केला जाणार आहे. यामध्ये प्रत्येकी १ किलो रवा, चणाडाळ, साखर आणि १ लिटर सोयाबीन तेल देण्यात येणार आहे.

### फडणवीस हेच महाराष्ट्राच्या राजकारातील चाणक्य

मुंबई : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राच्या राजकारणातला धुरंदर आणि चाणक्य असल्याचे वक्तव्य रयत क्रांती संघटनेचे प्रमुख सदाभाऊ खोत यांनी केले. त्या माणसाला प्रस्थापितांनी अनेक वेळा घेरण्याचा प्रयत्न केला. पण त्या माणसाचा आम्ही अभिमन्यू होऊ दिला नाही आणि भविष्यात देखील होऊ देणार नाही असे खोत म्हणाले.

भारतीय जनता पक्ष हा गावगाड्यांमध्ये काम करणारा पक्ष आहे. त्यांनी एका गावगड्यात काम करणा–या माणसाला उमेदवारी दिली आणि मी जिंकून आलो असेही खोत म्हणाले. आमच्या नऊच्या नऊ जागा जिंकून आल्या. जनतेला बरे वाईट कळते. चांगले निर्णय सरकारने घेतले आहेत. शेतक–यांच्या बाजूने निर्णय घेतले आहेत. त्यामुळे जनता फार खुश असल्याचे खोत म्हणाले.

हिंदू संस्कृतीत कोणतेही काम करायचे असेल तर श्री गणेशाचे दर्शन घेऊन काम करायचे असते, म्हणून आज सकाळी मी गणपती बाप्पाचे दर्शन घेतले. त्याला साकडे घातले की यावर्षी चांगला पाऊस पडू दे, यावर्षी धन धान्याची रास उभी राहू दे आणि पिकाला सोन्याचा भाव मिळू दे असे साकडे घातल्याचे खोत म्हणाले. पडक्या घराचे कोणी मालक होत नाही. त्यामुळं लक्षात आले त्या वाड्यातल्या लोकांना, की इथे चांगला निवारा मिळू शकतो म्हणून ते इथे आल्याचे खोत म्हणाले.

# दिक्षाभूमीतील अंडरग्राऊंड पार्किंग प्रकल्प रद्द

नागपूर : जगभरातील बौद्ध अनुयायांसह तमाम भारतीयांचे श्रद्धास्थान असलेल्या नागपूरच्या दीक्षाभूमी येथील अंडरग्राऊंड पार्किंग वादाचा विषय बनलं होतं. दीक्षाभूमी स्मारक समितीने मनमानी करत लोकांना विश्र्वासात न घेता हे विकासकार्य केल्याचा आरोप बौद्ध अनुयायी आंदोलकांनी केल्यामुळे या पार्किंगला कडाडून विरोध दर्शवत परिसरात जाळपोळही करण्यात आली. पार्किंगसाठी केलेला हा खड्डा बुजवण्यात यावा, अशी मागणी केली जात होती. दीक्षाभूमी स्मारक समितीच्या विनंतीनंतर लवकरच खड्डा बुजवण्याची प्रक्रिया सुरू होईल, अशी माहिती आता समोर आली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, खड्डा बुजवण्याच्या आक्रमक मागणीमुळे दीक्षाभूमी स्मारक समितीचे विश्र्वस्त विलास गजघाटे यांनी नुकतेच अंडरग्राउंड पार्किंगचे काम करणाऱ्या एनआयटी आणि एनएमआरडीएच्या अधिकाऱ्यांशी भेट घेत तो खड्डा बुजवण्याची मागणी केली. या अधिकाऱ्यांनी तसा प्रस्ताव शासनाच्या उच्च अधिकार समितीकडे पाठवला होता. यानंतर आता पार्किंगसाठी खोदण्यात आलेला परिसर ऑगस्ट महिन्याच्या शेवटी किंवा सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत समतल केला जाणार असल्याची माहिती समितीचे विश्र्वस्त विलास गजघाटे यांनी दिली आहे. ऑक्टोबर महिन्यात होणाऱ्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पूर्वी दीक्षाभूमीचा परिसर पूर्ववत होईल, असा विश्र्वासही गजघाटे यांनी व्यक्त केला आहे.

**बौद्ध अनुयायांनी केलं होतं आंदोलन**

दीक्षाभूमी परिसरात १ जुलै रोजी मोठ्या संख्येने जमलेल्या संतप्त जमावाने विकासकामाच्या साहित्याची तोडफोड केली. तर इतर (पान २ वर)

# शाळा, कॉलेज परिसरात एनर्जी ड्रिंक विकण्यास बंदी

मुंबई : एनर्जी ड्रिंक्स हा सध्याची तरुणाई आणि लहान मुलांमध्ये आवडीचा विषय आहे. बॉलिवूडचे टॉपचे अनेक हिरो या एनर्जी ड्रिंक्सच्या जाहिराती करतात, ज्यातून तुम्हाला हे ड्रिंक्स प्यायल्याने ताजंतवानं राहता येईल, असं सांगितलं जातं. त्यामुळे तरुणवर्ग साहजिकच याकडे आकर्षित होतो. या ड्रिंक्सच्या बॉटल्सवर अनेकदा १८ वर्षांखालील मुलांनी सेवन करु नये, असं लिहिलेलं असतं. मात्र, तरीही लहान मुलांकडूनही मोठ्या प्रमाणात याचं सेवन केलं जातं. हे टाळण्यासाठी राज्य सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

तरुण वर्गात दिवसेंदिवस एनर्जी ड्रिंकच्या नावाखाली कॅफेनयुक्त थंड पेय सेवन करण्याचे प्रमाण वाढले आहे. या पेयामुळे आरोग्याला मोठा धोका निर्माण होत आहे. शाळा परिसरात एनर्जी ड्रिंकची सहज विक्री होत असल्याने शाळेतील मुलांना ते सहज उपलब्ध होत आहे. राज्यामध्ये शाळा परिसरातील कॅफेनयुक्त थंड पेयांच्या विक्रीवर बंदी आणा, अशी मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी सभागृहात केली. आमदार सत्यजीत तांबेंनी मांडलेल्या मुद्द्यावर राज्य सरकारकडून मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी शाळा परिसरात ५०० मीटर अंतरावर कॅफेनयुक्त पेयांच्या विक्रीवर बंदी घालण्याचे जाहीर केले.

(पान २ वर)

## सिद्धेश्वर फाउंडेशन वृक्षा रोपण

सोलापूर / प्रतिनिधी– श्री सिद्धेश्वर फाउंडेशनच्या वतीने रविवार दिनांक १४ जुलै रोजी सकाळी नऊ वाजता ३६० वृक्षारोपण कार्यक्रम होणार आहे. या वृक्षयज्ञात आपण सगळे सहभागी व्हा. आपल्या हातून लावले जाणारे झाड जगवले जाणार आहे. या चांगल्या कार्याचे आपण भागीदार व्हावे ही विनंती. स्थळ निसर्ग वारी कृषी पर्यटन केंद्र हॉटेल पिकनिक पॉईंट/ झुला भोजन शेजारी सोलापूर पुणे हायवेवर.

### संभाजीनगरच्या तरुणांना ‘इसिस’चा विळखवा

छत्रपती संभाजीनगर : राष्ट्रीय तपास संस्थेने(एनआयए) मुंबई विशेष न्यायालयासमोर आरोपपत्र दाखल केले असून छत्रपती संभाजीनगरमधील इसिसच्या दहशतवादी कटात लिबियन नागरिकासह दोन आरोपींची नावे असून छत्रपती संभाजीनगरातील तरुण इसिसच्या विळख्यात अडकले असल्याची माहिती एका अधिका–याने दिली.

सद्यस्थितीत संभाजीनगरमधील तब्बल ५० विद्यार्थी आयसीसच्या जाळ्यात अडकल्याची धक्कादायक माहितीही समोर आली आहे. एनआयएने फेब्रुवारी २०२४ ला अटक केलेल्या महाराष्ट्रातील एम जोहेब खान आणि लिबियन एम. शोएब खान यांना छत्रपती संभाजीनगरमधील एका मॉड्यूलशी इसिसच्या जागतिक नेटवर्कशी संबंधीत दहशतवादी कटातील प्रमुख सूत्रधार म्हणून गुन्हा दाखल केला आहे. भारतात इसिसच्या नापाक कारवाया पुढे नेण्यासाठी आणि कट्टरपंथीय बनवण्याच्या उद्देशाने झोहेबने छत्रपती संभाजीनगरमधील ५० हून अधिक तरुणांसह एक व्हॉट्सॲप ग्रुप तयार केला होता, असे तपासात आढळून आले आहे.

जोहेबला शोएबने भरती केले आणि त्यांनी इसिसच्या भारतविरोधी अजेंड्याला चालना देण्यासाठी, देशभरातील संवेदनशील प्रतिष्ठानांवर दहशतवादी हल्ले करण्यासाठी असुरक्षित तरुणांची भरती करण्याचा कट रचला. एनआयएच्या विशेष न्यायालयासमोरील आरोपपत्राने आयएसआयएस/आयएसच्या परदेशातील हँडलर्सचा सहभाग असलेल्या कटाचे आंतरराष्ट्रीय संबंध उघड केले आहेत.

भारतविरोधी कारवायांचे जाळे उघड (पान २ वर)

# माजी राज्यपाल शिवराज पाटील चाकूरकर
## आ.शिवाजीराव पाटील कव्हेकरांच्याहस्ते सत्कार

लातूर/ प्रतिनिधी– देशाचे माजी गृहमंत्री तथा पंजाबचे माजी राज्यपाल मा.श्री.शिवराजजी पाटील चाकूरकर हे लातूर दौर्यावर आले असता भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा व गुजरात राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी त्यांच्या औसा रोड भागातील देवघर या निवासस्थानी भेट घेऊन त्यांचा पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला.



यावेळी माजी केंद्रीय गृहमंत्री तथा पंजाबचे माजी राज्यपाल शिवराज पाटील चाकूरकर साहेबांच्याबरोबर झालेल्या चर्चेमध्ये देशपातळीवरील व जागतिक स्थरावरील महान सुधारकांनी, संतांनी मानवाच्या, राष्ट्राच्या कल्याणासाठी चुकीच्या रूढी परंपरेला दूर सारून सत्यावर, सदाचारावर समाज निर्मितीसाठी मोलाचे योगदान दिले. याबरोबरच सध्या राजनीतीमधील सर्वच पक्षातील घसरत चाललेले स्वतः चे चारित्र्य, सामाजिक जाणिव, विकासात्मक दृष्टीकोन सेवाभाव व व्हिजन यामध्ये सकारात्मक बदल करण्यासाठी भारतीय मूल्य, अध्यात्म व थोर नेत्यांचे विचार स्मरणात ठेवण्याची नितांत गरज आहे, हे विचार तरूणांना प्राथमिक शिक्षणापासून देण्याची गरज आहे. अशी माहितीही चाकूरकर साहेबांनी दिली असल्याचे माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले.

# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात
## सरस्वती मूर्ती प्राण प्रतिष्ठापना

लातूर : येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयात शुक्रवारी अतिशय भक्तिमय वातावरणात सरस्वती मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी आणि सचिव रमेश बियाणी यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

दयानंद शिक्षण संस्थे अंतर्गत असणाऱ्या सर्वच महाविद्यालयात आतील बाजूस विद्येची देवता सरस्वती मातेची मूर्ती विराजमान करण्यात आली आहे. शुक्रवारी दयानंद वाणिज्य महाविद्यालयात

सरस्वती मूर्ती विराजमान



झाली. यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष संजय बोरा, विश्वस्त मंडळाचे सदस्य दीनानाथ भुतडा, बाबकिशन बांगड, विशाल अग्रवाल, सागर मंत्री, दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड, प्राचार्या डॉ.पूनम नाथानी, प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते, प्राचार्य डॉ. वाजेद चाऊस, उपप्राचार्य डॉ. सिध्देश्वर बेल्लाळे, दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, कार्यालयीन अधीक्षक राजेश सेलुकर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरस्वती मातेच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून सजावट करण्यात आली. या मूर्तीचे सर्वांना आकर्षण वाटते आहे.



# येरगी ग्राम पंचायत चे कार्य उल्लेखनीय :मीनल करनवाल

## मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना मेळावा सह विविध कार्यक्रम संपन्न





देगलूर(प्रतिनीधी): नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातील चालुक्य कालीन नगरी येरगी चे ग्राम पंचायत हे सर्वोत्कृष्ट होण्याच्या मार्गावर असून ग्रामपंचायतीचे कार्य उल्लेखनीय आहे.विविध क्षेत्रात येरगी ग्रामपंचायत अग्रेसर भूमिका घेत असून नांदेड जिल्ह्यात बालिका पंचायत राज चे कार्य सर्वात चांगले आहे त्याचा पुरस्कार ही त्यांना प्राप्त झाला आहे. असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी केले.

त्या देगलूर तालुक्यातील येरगी येथे काल गुरुवार दिनांक ११ जुलै रोजी बालीका पंचायत व ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होत्या. यावेळी तहसीलदार राजाभाऊ देशमुख, संजय गांधी निराधार योजना चे अध्यक्ष संतोष पाटील,गट विकास अधिकारी शेखर देशमुख, नायब तहसीलदार संजय नागमवाड, तालुका आरोग्य अधिकारी रमेश गवाले,वैद्यकीय अधिकारी डॉ.योगिता चामले,बाल विकास प्रकल्प अधिकारी राजुरे, सरपंच सुनीता मठवाले, उपसरपंच मारोती तलारवार, विठ्ठाबाई बरसमवार, सुशिलाबाई सोमावार, कोंडाबाई वाघमारे, अशोक वाघमारे, विश्वनाथ बागेवार, बीट जमादार दीपक जोगे,पोस्ट कार्यालयाचे हणमंत जामनोर,पूजा जाधव,शिवप्रसाद देशमुख, गोरसुंदर कानोळे, तोसिफ शेख, वन विभागाचे अधिकारी, पोलीस विभागाचे अधिकारी आदींची उपस्थिती होती. ते म्हणाले की वृक्षारोपण ,दारूबंदी,शिक्षण,आरोग्य,बालिका आणि महिला सबलीकरणासाठी येरगी बालिका पंचायत व ग्राम पंचायत कडून विविध प्रकारच्या योजना राबवण्यात येत आहेत.जे आदर्शवत आहेत.

पुढे विद्यार्थ्यांना उद्देशून म्हणाल्या की शैक्षणिक यशासह सामाजिक, सांस्कृतिक आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. तसेच शिक्षक आणि पालकांनाही विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन देण्याचे आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनुकूल वातावरण तयार करण्याचे आवाहन केले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने संदर्भात महिलांना मार्गदर्शन केले. तसेच या योजनेचे अर्ज भरून घेण्यात आले.

बालीका पंचायत उपक्रमात येरगी ग्राम पंचायतीने जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी येरगी ला प्रथमच भेट दिली.त्यांनी ग्राम पंचायत आणि बालिका पंचायत राज समितीच्या वतीने गावात केलेल्या विकासाची नोंद घेत कौतुक केले.आणि जिल्ह्यातील इतरांनी या गावचा आदर्श घेतला पाहिजे असे सांगितले.तसेच संतोष पाटील यांच्यासारख्या युवक प्रत्येक गावात असेल तर त्या गावचा कायापालट नक्कीच होईल असे म्हणाले.

या कार्यक्रमात बालिका पंचायत व ग्रामपंचायतीच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्यासह मंचावरील उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शाळा परिसरामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी करनवाल यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच सुकन्या समृद्धी योजनेत संतोष पाटील यांच्या वतीने गावातील बालीकांचे खाते काढण्यात आलेले पासबुकचे वितरण करण्यात आले.

येरगी ग्रामपंचायतीने बालिका पंचायत उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊन गावात सकारात्मक बदल करण्यासाठी पुढाकार घेतला. तसेच अनेक दिवसांपासून दर रविवारी गावात राबविण्यात येणाऱ्या सामूहिक स्वच्छता मोहिमेबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी ग्रामपंचायत, बालिका पंचायत तसेच गावकऱ्यांचे कौतुक केले. ही मोहीम पुढे सुरू ठेवून गावाचा कायापालट करुन इतर गावांना मार्गदर्शक ठरावे, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील सहशिक्षक ईश्वर वाडीकर यांनी केले तर प्रभात फेरी व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालिका पंचायत राज समितीचे महादेवी दाणेवार, पुनम सुर्यवंशी, अंजली वाघमारे, करूणा बागेवार, शिवाणी मटपती, अनिता बागेवार, महादेव गादगे, रोहिणी दाणेवार, रूद्राणी चैडके, शिवकांता भुरळे, श्रीदेवी धाकपाडे, सर्व पदाधिकारी आणि शाळेतील शिक्षक आनंद कदम, राहुल ढगे, सिध्देश्वर कुंटे, भुमन्ना तलगे, रमाकांत वाघमारे हणमंत ठावरे आदींनी परिश्रम केले. या कार्यक्रमाला सर्व बालिका पंचायत राज ,सरपंच, ग्रामपंचायत सदस्य ,तंटामुक्त अध्यक्ष, पोलिस पाटील यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, शालेय विद्यार्थी व महिला यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## राहुल ईश्वरलाल चव्हाण यांची लोकाधिकार संघ अकोला जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती




लोकाधिकार संघ या संघटनेच्या अकोला जिल्हाप्रमुख पदी श्री. राहुल ईश्वरलाल चव्हाण रा.तेल्हारा ता. तेल्हारा जि. अकोला यांची नियुक्ती लोकाधिकारप्रमुख मा. श्री. व्यंकटरावजी पनाळे साहेब यांनी केली आहे. अकोला जिल्हाप्रमुख पदी नियुक्ती केल्याचे नियुक्तीपत्र लोकाधिकार संघाचे प्रमुख मा. श्री व्यंकटरावजी पनाळे साहेब यांच्या हस्ते अकोला जिल्हाप्रमुख श्री. राहुल ईश्वरलाल चव्हाण यांना देण्यात आले.

## राज प्रतिष्ठानतर्फे वारकऱ्यांना चादर वाटप

**लातूर / प्रतिनिधी-** श्री क्षेत्र पंढपूर येथे आषाढी वारीनिमित्त पायी जाणाऱ्या वारकऱ्यांना येथील राज प्रतिष्ठानच्यावतीने ऊबदार चादरींचे वाटप करण्यात आले.

राज प्रतिष्ठानकडून सातत्याने विविध सामाजिक आणि धार्मिक उपक्रम राबविण्यात येतात. प्रतिष्ठानच्या अध्यक्षा डॉ. शुभांगी राऊत, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, डॉ. छाया ढेले, डॉ. मीनाक्षी पौळ - पाटील, डॉ. श्वेता पवार, डॉ. स्मिता वडे, डॉ. पल्लवी जाधव, सुनीता चितकोटे, सुरेखा गरड, राजश्री ईटकर, डॉ. गणेश घोडके, डॉ. वर्धमान उदगीरकर यांच्या हस्ते आषाढी वारीनिमित्त पायी जाणाऱ्या वारकऱ्यांना या चादरी देण्यात आल्या. सामाजिक बांधिलकी हे प्रतिष्ठानने अंगिकारलेले व्रत असून विविध कार्यक्रम व उपक्रमांच्या माध्यमातून ते सुरू असल्याचे प्रतिष्ठानचे डॉ. हर्षवर्धन राऊत यांनी सांगितले.

## गुड मॉर्निंग, शुभ संध्या, गुड नाईट चित्रे धोकादायक

कृपया गुड मॉर्निंग, शुभ संध्या, गुड नाईट आणि इतर रेडीमेड शुभेच्छा आणि धार्मिक संदेशांचे सर्व फोटो आणि व्हिडिओ शक्य तितक्या लवकर हटवा. पुढील लेख काळजीपूर्वक वाचा; तुम्हाला का ते समजेल.

बेकायदेशीर घुसखोरी रोखण्यासाठी कृपया हा संदेश जास्तीत जास्त मित्रांना तातडीने पाठवा.

ओल्गा निकोलायव्हनास या वकिलाकडून चेतावणी. लक्ष द्या! ज्यांना सुप्रभात पाठवायला आवडते त्यांच्यासाठी हा एक सुंदर दिवस आहे! गुड मॉर्निंग, शुभ संध्या, गुड नाईट इत्यादी चित्र... कृपया हे चांगले संदेश पाठवू नका. आज, शांघाय चायना इंटरनॅशनल न्यूजने सर्व सदस्यांना आणि तज्ञांना डजड पाठवले. सल्ला: शुभ प्रभात, शुभ रात्री इ. चित्रे आणि व्हिडिओ पाठवू नका. कारण अहवालात असे दिसून आले आहे की, ज्यांनी या प्रतिमा डिझाइन केल्या आहेत आणि या प्रतिमा आणि व्हिडिओ सुंदर आहेत; ते हॅकर्स त्यात एक छुपा फिशिंग कोड टाकतात आणि जेव्हा प्रत्येक जण हे संदेश पाठवतो तेव्हा ते हॅकर्स तुमच्या फोनमध्ये घुसतात आणि तुमचे बँक कार्ड माहिती आणि डेटा यांसारखी वैयक्तिक माहिती चोरण्यासाठी तुमचे डिव्हाइस वापरतात. ५ लाखा हून अधिक पीडितांची फसवणूक झाल्याची नोंद आहे. तुम्हाला इतरांना नमस्कार, शुभ प्रभात, शुभ रात्री इ. चित्रे पाठवायचे असल्यास कृपया तुमच्या स्वतःच्या शुभेच्छा लिहा आणि तुमचे स्वतःचे फोटो किंवा व्हिडिओ पाठवा; जेणेकरून तुम्ही स्वतःचे आणि तुमच्या कुटुंबाचे आणि मित्रांचे संरक्षण करू शकाल. महत्वाचे! सुरक्षित राहण्यासाठी, कृपया तुमच्या फोनवरील सर्व शुभेच्छा आणि चित्रे हटवून खात्री करा. जर कोणी तुम्हाला अशा प्रतिमा पाठवल्या असतील, तर त्या ताबडतोब तुमच्या डिव्हाइसवरून काढून टाका. दुर्भावनायुक्त कोड उपयोजित होण्यास थोडा वेळ लागतो, म्हणून आपण त्वरित कारवाई केल्यास, कोणतीही हानी होणार नाही. हॅक होण्यापासून रोखण्यासाठी तुमच्या सर्व मित्रांना सांगा. तुमच्या स्वतः च्या शब्दात नमस्कार सांगा आणि शुभेच्छा देण्यासाठी फक्त तुमच्या स्वतःच्या तयार केलेल्या प्रतिमा आणि व्हिडिओ पाठवा, जे तुमच्यासाठी, तुमच्या कुटुंबासाठी आणि मित्रांसाठी पूर्णपणे सुरक्षित आहे. कारण प्रत्येकाच्या मोबाईल फोनला बँक कार्ड जोडलेले असते आणि प्रत्येकाच्या मोबाईल फोनमध्ये अनेक संपर्क असतात. हा हॅक केवळ स्वत:साठीच नाही तर तुमच्या फोनला, मित्रांना आणि ओळखीच्या लोकांनाही धोका निर्माण करतो!

हे क्रूर आहे. तुमच्या मोबाईल फोनचे सिमकार्डला भेट देण्यासाठी दहशतवाद्यांनी वापरलेले हे एक नवीन तंत्र आहे; जेणेकरून तुम्ही त्यांचे साथीदार व्हाल!!! कोणतीही अनधिकृत घुसखोरी थांबवण्यासाठी हा संदेश तुमच्या जास्तीत जास्त नातेवाईक आणि मित्रांना पाठवा!!! सावध रहा !! मी देखील आता पाठविणार नाही.

****

**– सौजन्य : अरुण पाटील धनोरकर**

## आजकाल मुलांच्या लग्ना वय निघून जातो

आजकाल तरूण तरूणींच्या लग्नाचे वय वाढत असल्याचे दिसून येत आहे. कांही वर्षांपूर्वी मुलीचे लग्नाचे वय २१ ते २३ दरम्यान तर मुलांचे वय २६ ते २९ दरम्यान होते ते आता अनुक्रमे २६ ते ३० व मुलांसाठी ३० ते ३६ पर्यंत वाढलेले दिसते आहे. मागची कारणेही विचार करण्यासारखी आहेत.

कोणती आहेत ही कारणे? या तरूण पिढीच्या विशलिस्टमध्ये लग्न आहे हे नक्की. मात्र कांही गोष्टींची पूर्तता होईपर्यंत थांबण्याची या पिढीची तयारी आहे. लग्नावर या पिढीचा विश्वास आहे त्यामुळेच आपल्या बरोबरीच्या मित्रमैत्रिणींची लग्ने ठरल्याचे पाहून ते थोडेफार दुःखीही होतात मात्र म्हणून तातडीने लग्न करण्याचा निर्णय मात्र घेत नाहीत हे विशेष. ड्रीम वेडींग- आजकालच्या मुलामुलींसाठी लग्न हे ड्रीम आहे.

त्यात मुलींना लग्नाचे स्थळ, हनीमून, लग्नाचे कपडे व पुढचे आयुष्य सुखी समाधानी असेल याची शाश्वती हवी असल्याचे दिसते तर मुलांना लग्नानंतर येणार्या जबाबदार्यांची पूर्ण जाणीव आहे व त्यामुळे स्थिर करियर, सेव्हींग तगडे असावे अशी अपेक्षा आहे. पूर्वीच्या तुलनेत आज करियरसाठीची स्पर्धाही तीव्र आहे त्यामुळे चांगली जीवनशैली जगताना घर, गाडी असणेही आवश्यक वाटते आहे. त्याची पूर्तता करण्यासाठी थोडा अवधी हवा म्हणून लग्नाचे वय वाढत चालले आहे. शिक्षण व करियर-आजकाल मुलींही शिक्षण व करियर हा जीवनातले अविभाज्य अंग असल्याचे मानत आहेत. पूर्वी पदवीनंतर मुलीच्या लग्नाची तयारी सुरू केली जात असे आज मात्र पदव्युत्तर शिक्षण, नोकरी याला मुली महत्त्व देत आहेत.

मुलांनाही नोकरीवाली व करियरवाली मुलगी हवी आहे त्यामुळे मुलींचेही लग्नाचे वय पुढे गेले आहे. समजून घेण्यासाठी वेळ- लव्ह मॅरेज असो अथवा अॅरेंज मॅरेज असो, मुलगा व मुलगी दोघांनाही या बंधनात पडण्यापूर्वी एकमेकांना समजून घेण्याची आवश्यकता वाटते आहे. त्यामुळे पूर्ण ओळख झाल्यावर अथवा साखरपुडा झाल्यानंतरही सात आठ महिन्यांनंतरच लग्नाचा विचार केला जात असल्याचे दिसून येत आहे. आवडनिवड जुळली, विचार जुळले तरच लग्नाचे पाऊल टाकले जात आहे.

दीर्घकाळ पतीपत्नीसारखे राहणार्या जोडप्यांचे कालांतराने पटले नाही तर महिलांना पोटगीचा अकार दिला गेला आहे. याचाही विचार केला जात आहे. परफेक्ट मॅच- दोन दशकांपूर्वी उपवर मुलीला स्वयंपाक करता आला, घरकाम करता आले की पुरेसे होत असे तसेच मुलाला चांगला पगार व घरदार असले की मुलींच्याही फारशा अपेक्षा नसत. आता गरजा वाढल्याने मुलांना शिकलेली, मिळवती मुलगी हवी असते तर मुलीही घरकामात मदत करणारा, विचार जुळणारा मुलगा हवा यासाठी कांही काळ वाट पाहण्यास तयार आहेत. या व अशा अनेक कारणांनी लग्नाचे वय मात्र पुढे गेले आहे.

****

**– सौजन्य : अशोक शिवपुणे, पुणे**

**पान १ वरून**

**'मुंबईला...**

माहितीही देण्यात आली. यावेळी, मुख्यमंत्र्यांनी आवर्जून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा उल्लेख करत महिलांच्या प्रगतीसाठी ही योजना राबविण्यात येत असल्याचे म्हटले. यावेळी, भाषण करताना नरेंद्र मोदींनी पुढे बोलताना नरेंद्र मोदींनी म्हटले की, येथील ३० हजार कोटींच्या प्रकल्पांचे लोकार्पण व भूमिपूजन होत आहे. मुंबईला अधिक गतीमान करण्यासाठी या प्रकल्पांचा फायदा होणार आहे. तिसऱ्यांदा देशातील लोकांनी आमचे स्वागत केले असल्याचे मोदी यावेळी म्हणाले.

१० लाखांपेक्षा अधिक जणांना मिळणार रोजगार

यावेळी, पंतप्रधानांनी मुंबईसह महाराष्ट्रावर भरभरुन प्रेम असल्याचे सांगत मोदी पुढे म्हणाले की, अशा महाराष्ट्र राज्याची विकासाची क्षमता आणखी वाढवण्यासाठी आणि मुंबई तसेच महाराष्ट्राला प्रगतीपथावर नेण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. यासाठी अनेक प्रकल्प मुंबई तसेच राज्यात हाती घेण्यात आले आहेत. या प्रकल्पामुळे मुंबई आणि आजुबाजुचा परिसर जोडला जाईल. या प्रकल्पामुळे १० लाखांपेक्षा अधिक जणांना रोजगार मिळेल. यामुळे मुंबई आणि उपनगरांमध्ये नागरिकांचा प्रवास सुखकर होणार असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा शुभारंभ

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज मुंबईत २९ हजार ४०० कोटी रुपयांपेक्षा अधिक किंमतीच्या रस्ते, रेल्वे आणि बंदर क्षेत्राशी संबंधित प्रकल्पांचा शुभारंभ केला. ठाणे-बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पाचे आणि गोरेगाव-मुलुंड जोडरस्ता प्रकल्पांतर्गत दुहेरी बोगद्यांचे भूमिपूजन त्यांनी केले. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा शुभारंभही त्यांच्या हस्ते करण्यात आला. लोकमान्य टिळक टर्मिनस येथील नवीन प्लॅटफॉर्मचे आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील विस्तारित प्लॅटफॉर्मचे पंतप्रधान मोदींनी राष्ट्राला समर्पण केले.

सह्याद्रीच्या डोंगरावर फिरण्याची वेगळी अनुभूती

पंतप्रधान मोदी म्हणाले की, महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचे प्रतिक असलेले किल्ले आहेत, कोकणातले टूरिझम आहे, समुद्राच्या तळाचे मनमोहक दृष्ट आहे, सह्याद्रीच्या डोंगरावर फिरण्याची वेगळी अनुभूती आहे. त्यामुळे महाराष्ट्राला विकासाच्या शिखरावर नेण्याचे काम आपल्याला करायचे आहे. मुंबईमध्ये १० वर्षांपूर्वी आठ किलोमीटर मेट्रो रेल्वे झाली होती. आज मुंबई मेट्रो ८० किलोमीटरपर्यंत गेली आहे. पुढेही २०० किलोमीटरपर्यंतचे काम प्रगतीपथावर आहे. मागच्या दहा वर्षात महाराष्ट्रात नॅशनल हायवेची लांबी वाढून तीनपट झाली आहे. गोरेगाव-मुलुंड लिंक रोड प्रोजेक्ट हा प्रगती आणि प्रकृतीचं उत्कृष्ट उदाहरण आहे. ठाणे ते बोरीवली रस्त्याचे कामही सुरु आहे.

### दिक्षाभूमीतील...

विकासकामाला आमचा विरोध नसून केवळ चुकीच्या पद्धतीने होत असलेल्या अंडरग्राऊंड पार्किंगला आमचा कडाडून विरोध असल्याचे मत या आंदोलकांनी व्यक्त केलं होतं. त्यानंतर राज्य सरकार आणि दीक्षाभूमीचे व्यवस्थापन सांभाळणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर दीक्षाभूमी स्मारक समितीनेही अंडरग्राउंड पार्किंगचे प्रकल्प रद्द केल्याचे जाहीर केले होते. मात्र, अंडरग्राउंड पार्किंगसाठी दीक्षाभूमीच्या परिसरात खोदलेला अवाढव्य खड्डा तसाच कायम होता. आंदोलनकर्त्यांचा रोष लक्षात घेता त्यांची मागणी आता पूर्ण केली जाणार आहे व लवकरच खड्डा बुजवण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे.

समाजमाध्यमावर खोट्या अफवा, त्यातून आंदोलनाचा भडका

वस्तुस्थितीशी कोणताही संबंध नसताना केवळ समाजमाध्यमांवरच्या खोट्या अफवा आणि त्या अफवांची कसलीही चौकशी न करता त्यावर सामान्य नागरिकांनी विश्र्वास ठेवला. परिणामी त्यातूनच आंदोलनाचा भडका उठल्याचे मत दीक्षाभूमी स्मारक समितीचे सदस्य डॉ. प्रदीप आगलावे यांनी व्यक्त केले. दीक्षाभूमी येथे झालेल्या आंदोलनाआधी अंडरग्राऊण्ड पार्किंगचा नागपूर मेट्रोशी कोणताही संबंध नसताना फक्त अंडर ग्राऊण्ड पार्किंगच्या ठिकाणी सुरक्षेसाठी आणलेल्या बॅरिकेट्स वर नागपूर मेट्रो लिहिले होते. त्यामुळे ही पार्किंग नागपूर मेट्रोला दिली जाईल, ही अफवा पसरवण्यात काही समाजकंटक यशस्वी झाले, असं स्मारक समितीचे अध्यक्ष प्रदीप आगलावे यांनी सांगितलं.

### शाळा, कॉलेज...

राज्यातील सर्वच शहरी आणि ग्रामीण भागात कॅफेनयुक्त पेय तसेच नशेच्या गोळ्या बाजारात विक्रीसाठी सहज उपलब्ध आहेत. तरुण वर्गासोबतच लहान मुलेदेखील याकडे आकर्षित होत आहेत. शाळा व महाविद्यालय परिसरात एनर्जी ड्रिंक्स सहज उपलब्ध होत असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे. त्याचबरोबर जाहिरातीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात एनर्जी ड्रिंक्सचा प्रसार केला जातो. एनर्जी ड्रिंक्सच्या जाहिरातींवरही सरकारने बंदी घालावी. तसेच शाळा परिसरात कॅफेनयुक्त थंड पेयांच्या विक्रीवर बंदी घालून योग्य कार्यवाही करावी. याबाबत संबधित अधिका-यांसोबत एक बैठक घेण्यात यावी, अशी मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी सभागृहात केली.

शाळा परिसरात एनर्जी ड्रिंक विकण्यास बंदी

सत्यजीत तांबेंच्या मागणीवर सभापती नीलम गोऱ्हे यांनी चिंता व्यक्त करीत येत्या १५ दिवसांत बैठक घेण्याचे आदेश संबंधित मंत्री आणि प्रशासनाला दिले. त्यानुसार अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी शाळा परिसरात ५०० मीटर अंतरावर कॅफेनयुक्त पेयांवर (एनर्जी ड्रिंक्स) तातडीने बंदी घालण्यात येईल. त्याचबरोबर अन्न व औषध प्रशासनाकडून तपासणी करून योग्य कार्यवाही करण्यात येईल, असे आदेश दिले आहेत.

### संभाजीनगरच्या...

एनआयएच्या तपासात झोहेब आणि शोएब यांचा समावेश असलेल्या भारतविरोधी कारवायांचे जाळे आधीच उघड झाले आहे, ज्यांनी इसिसच्या स्वयं-अभिषिक्त खलिफाकडे 'बयथ (निष्ठा शपथ)' घेतली होती. एनआयएच्या तपासानुसार, भारताला अनेक दहशतवादी हल्ले केल्यानंतर, जोहेब आणि शोएब यांनी तुर्की किंवा अफगाणिस्तानात पळून जाण्याची योजना आखली होती.

वेबसाइट विकसित

हिंसक, अतिरेकी इसिस विचारसरणीचा प्रचार करण्यासाठी वेबसाइट विकसित आणि होस्ट करण्यात त्यांचा सक्रिय सहभाग होता ज्याद्वारे त्यांनी जगभरातील तरुणांना करकर मध्ये भरती करण्याची योजना आखली होती. भारतात इसिसच्या नापाक कारवाया पुढे नेण्यासाठी आणि कट्टरपंथीय बनविण्याच्या उद्देशाने झोहेबने छत्रपती संभाजीनगरमधील ५० हून अधिक तरुणांसह एक व्हॉट्सअप ग्रुप तयार केला होता, असे तपासात आढळून आले आहे.

## सामाजिक कार्यकर्ते विश्वास रणे पँथररत्न पुरस्काराने सन्मानित



नळदुर्ग दि.१३ (प्रतिनिधी) - येथील छत्रपती शिवाजी महाराज, महत्मा फुले, छत्रपती शाहु महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चळवळीतील युवा नेतृत्व विश्र्वास जनार्धन रणे यांना राज्यस्तरीय पँथररत्न पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

शोशीतांचा लढा उभारणाऱ्या पद्माश्री संस्थापक अध्यक्ष स्व नामदेव ढसाळ यांच्या दलित पॅन्थर संघटनेच्या ५२ वा वर्धापन दिनानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मोनिकाताई मोहोळ या उपस्थित होत्या. दलित पॅन्थरच्या ५२ व्या वर्धापन दिनानिमित्त ५२ विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना सन्मान चिन्ह, शाल व फेटा बांधून सन्मानित करण्यात आले. विश्र्वास रणे हे अनेक वर्षापासून नळदुर्ग व परिसरातील सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असून त्यांनी विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व गोरगरीब विद्यार्थ्यांना तसेच पालात राहून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेपयोगी साहित्य, गणवेश व अन्नदान करून आपले कार्य जीवीत ठेवले आहे. पुणे शहरामध्ये गेले अनेक वर्षे जनहित सामाजिक संस्थेच्या माध्यमातून एचआयव्ही व टि.बी. असलेल्या रूग्ण व त्यांच्या मुलांसोबत विविध उपक्रमांच्याद्वारे त्यांची सेवा करतात. या सर्व गोष्टींचा अभ्यास विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. या पुरस्कारांचे वितरण

दलित पँथर आफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष यशवंत नडगम यांच्या हस्ते करण्यात आले. या पुरस्काराबद्दल रणे यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

## वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणाच्या विलंब शुल्कास स्थगिती - पाटील

धाराशिव दि.१३ (प्रतिनिधी) - वाहनांच्या नूतनीकरणास विलंब झाल्यास प्रती दिन ५० रुपये दंड आकारण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला होता. त्याची अंमलबजावणी सुरू केल्याने रिक्षाचालक व इतर वाहन चालक तसेच त्यांच्या संघटनांनी विरोध दर्शवीत हा दंड रद्द करण्याची मागणी मुख्यमंत्र्याकडे केली होती. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी या निर्णयास स्थगिती दिली असल्याची माहिती उप प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी विजय पाटील यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात असे नमूद करण्यात आले आहे की, वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणाचे विलंब शुल्क प्रती दिन ५० रुपये आकारण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली होती. हे विलंब शुल्क माफ करणे, विलंब शुल्काच्या आकारणीमधून सूट देण्याबाबत ऑटोरिक्षा-टॅक्सी चालक संघटना तसेच विविध परिवहन संवर्गातील वाहनधारकांच्या संघटनांकडून शासनाकडे निवेदने प्राप्त झाली आहेत.

त्यामुळे शासनाने वाहनधारक व विविध संघटना यांच्या निवेदन व मागणीचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन मुख्यमंत्र्यांनी या प्रस्तावास मान्यता दिली. तसेच त्यास अनुसरुन परिवहन प्रभारी मंत्र्यांनी दि. ११ जुलै रोजी विधानसभा सभागृहात निवेदनाद्वारे १५ वर्षाच्या आतील सर्व परिवहन वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणास विलंब झाल्यानंतर प्रती दिन ५० रुपये विलंच शुल्क आकारण्याच्या कार्यवाहीस पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे शासनाने दि. ११/०७/२०२४ रोजीच्या निर्देशाद्वारे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी येणाऱ्या १५ वर्षांच्या आतील सर्व परिवहन वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणास विलंब झाल्यानंतर प्रतीदिन ५० रुपये विलंब शुल्क आकारण्याच्या कार्यवाहीस पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे सर्व वाहनधारकांनी याची नोंद घ्यावी व आपली वाहने योग्यता प्रमाणपत्र नुतणीकरणासाठी सादर करावीत, असे आवाहन पाटील यांनी केले आहे.

यशवंत

धाराशिव जिल्हा

रविवार दि. १४ जुलै २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com


## जुनोनी येथील सोयाबीन शेती शाळेस शेतकऱ्यांचा प्रतिसाद




धाराशिव दि.१३ (प्रतिनिधी) – तालुक्यातील जुनोनी येथे राष्ट्रीय खाद्य योजने अंतर्गत सोयाबीन शेती शाळेचे आयोजन दि.१२ जुलै रोजी करण्यात आले होते. या शाळेस शेतकऱ्यांनी मोठा प्रतिसाद दिला.

धाराशिव तालुक्यातील जुनोनी येथील शेती शाळेस डॉ.प्रा. सुर्यवंशी यांनी सोयाबीन पिकावरील किडी व रोग यांची ओळख व त्यावरील रासायनिक उपायोजना या संदर्भात सखोल मार्गदर्शन केले. तर विभागीय कृषी सहसंचालक दिवेकर यांनी ऑनलाईन शेतकऱ्यांना या शेती शाळेच्या उपक्रमाविषयी मार्गदर्शन केले. तसेच असलकर यांनी सोयाबीन पिकाविषयी मार्गदर्शन केले. या शेती शाळेस सरपंच अमोल मुळे उपविभागीय कृषी अधिकारी श्री आसलकर साहेब, मंडळ कृषी अधिकारी तीर्थकर साहेब कृषी पर्यवेक्षक कदम, कृषी सहाय्यक नितीन जाधव व संतोष माळी आदींसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धाराशिव- तुळजापुर- सोलापूर रेल्वे मार्ग जलद गतीने पुर्ण करा – खा. राजेनिंबाळकर

धाराशिव दि.१३ (प्रतिनिधी) – धाराशिव तुळजापूर सोलापूर रेल्वे मार्ग जलद गतीने पूर्ण करावा अशा सूचना खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी रेल्वे विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना दि.१३ जुलै रोजी दिल्या.

मध्य रेल्वे सोलापूर विभागाचे विभागीय व्यवस्थापक यांच्यासोबत धाराशिव – तुळजापुर – सोलापूर रेल्वे मार्ग संदर्भात विभागीय कार्यालयात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, लातूर- कुर्डुवाडी हा रेल्वे मार्ग पूर्वी नॅरोगेज होता. २००४ मध्ये या रेल्वे मार्गाचे ब्रॉडगेज रेल्वेमार्गात रुपांतर केल्यानंतर शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये रेल्वे विभागाने अतिक्रमण करुन रेल्वे विद्युतीकरणाचे पोल रोवले असल्याच्या अनेक शेतकऱ्यांच्या तक्रारी होत्या. त्यासाठी रेल्वे विभागाने अधिकचे भुसंपादन केले आहे का ? व केले असल्यास त्याचा मोबदला शेतकऱ्यास देण्यासाठी व भूसंपादन केले नसल्यास ती जमीन रेल्वे विभागाची असल्याचा भक्कम पुरावा देण्याच्या सक्त सूचना रेल्वे अधिकाऱ्यांना दिल्या. तर रेल्वेच्या बांधकाम विभागामार्फत रेल्वे मार्गाच्या बाजूचे रस्ते व रेल्वे स्टेशनकडे जाणारा रोड अशा अनेक प्रकारची कामे केलेले आहेत. ही कामे अत्यंत निकृष्ठ दर्जाची असून या संदर्भात गेल्या ५ वर्षांपासूनचा अहवाल व कामाची तपासणी करुन घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच

धाराशिव येथील रेल्वे स्टेशनचे अमृत अटल योजनेंतर्गत विकास करण्याचे काम प्रगतीपथावर असून या कामाचा उच्च दर्जा राखावा व प्रत्येक महिन्याला या कामचा आढावा घेण्यात येईल सांगितले. तर धाराशिव- तुळजापुर- सोलापूर या प्रस्तावित नवीन रेल्वेमार्गाचे काम प्रगतीपथावर असून ते काम ३ टप्यात पूर्ण होणार आहे. यातील पहिल्या टप्यातील जमीनीचे ७० टक्के जमीनीचे अधिग्रहण झाले असून ९५ टक्के भूसंपादन झाल्यानंतरच रेल्वे लाईनचे प्रत्यक्ष काम सुरु होणार असल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले. तसेच रेल्वे मार्गाचे भूसंपादन लवकर करणे व ते रेल्वे मार्गाचे काम जलद गतीने होण्यासाठी रेल्वेचे उच्च पदस्त अधिकारी व जिल्हाधिकारी धाराशिव यांच्यासोबत संयुक्त बैठक आयोजीत करण्याची सूचना केली. यावेळी सोलापूर मध्य रेल्वे विभागाचे व्यवस्थापक निरजकुमार डोहरे, शैलेंद्रसिंग परीहार (सी.पी.एम.), प्रदिप बनसोडे (उपअभियंता बांधकाम), सचिन गाणेर, एम. जगदिश, योगेश पाटील, आदित्य, एस.बी. कुलकर्णी आदीसह मध्य रेल्वेचे अधिकारी उपस्थित होते.




## वीररत्न शिवा काशीद यांचा स्मृतीदिन, बलिदान दिनानिमित्त अभिवादन



परंडा दि.१३ (प्रतिनिधी) – वीररत्न शिवा काशीद यांचा स्मृतीदिन, बलिदान दिन येथील भुईकोट किल्लयात दि.१३ जुलै रोजी अभिवादन करण्यात आले. स्वराज्याच्या संरक्षणासाठी आपल्या बलिदानाची आहुती देणारे शिवाजी महाराजांचे विश्वासु मावळे वीर शिवा काशीद हे इतिहासात कायम अजरामर झाले. जन्माला शिवाजी काशीद म्हणून जन्मले असले तरी शेवटच्या क्षणी शिवाजी महाराजांच्या नावाने वीरमरण पत्करले हे लाखमोलाचे आहे, असे मत शिवव्याख्याते शरद नवले यांनी व्यक्त केले.

यावेळी शिवव्याख्याते शरद नवले व मेजर महावीर तनपुरे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. सिद्दी जौहारने शिवाजी महाराजांना कैद करण्यासाठी पन्हाळगडाला वेढा दिला होता. या कैदेतून राजांची सुटका करण्यासाठी शिवाजी महाराजांचा हुबेहुब वेश परिधान करुन सिध्दी जोहारला भेटण्यासाठी गेलेल्या वीर शिवा काशीद यांना प्राणाचे बलिदान द्यावे लागल्याचा इतिहास आहे. तसेच नवले यांनी ऐतिहासीक दाखले देत वीर शिवा काशीद यांच्या जीवनकार्यासह, चित्तथरारक प्रसंग, बलिदानदिनाची माहिती सांगितली. यावेळी मेजर महावीर तनपुरे, सुवर्णकार संघटनेचे मराठवाडा सचिव मनोज चिंतामणी, व्हाईस ऑफ मिडीया जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश काशीद, तालुकाध्यक्ष प्रमोद वेदपाठक, विशाल काशीद, सुवर्णकार संघटना तालुकाध्यक्ष मनोज शहाणे, संतोष भालेकर, ॲड अनिकेत काशीद, विरेंद्रबाबी काशीद, मयुर डाके, आकाश काशीद, करण काशीद, महेश ऐतवाडे आदींसह नाभिक समाज बांधव उपस्थित होते.

## श्रीलक्ष्मी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्यावतीने स्कूल बॅगचे वाटप




धाराशिव दि.१३ (प्रतिनिधी) – कळंब तालुक्यातील हासेगाव (शि) येथील श्रीलक्ष्मी बहुउद्देशिय सेवाभावी संस्थेच्यावतीने अध्यक्षा तथा भारतीय जनता पार्टी पंचायतराज व ग्रामविकास विभाग, मराठवाडा विभाग सहसंयोजक व भाजपा जिल्हा उपाध्यक्षा डॉ. सरोजनीताई राऊत यांच्या हस्ते शालेय विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले.

कळंब तालुक्यातील वाठवडा व नायगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील मंथन परीक्षेतील गुणवत्ता प्राप्त व शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप करण्यात आले. पावसाळा सुरू झाल्याने शैक्षणिक साहित्याचे संगोपन करणे विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे असते. त्यामुळे गरजू विद्यार्थी व गुणवंत विद्यार्थ्यांचा स्कूल बॅग देऊन गौरव करण्यात आला. यावेळी वाठवडा जिल्हा परिषद

शाळेतील प्रगती कोकाटे, प्रांजल कुंभार, आदित्य येवतकर, कपिल राऊत, योगिनी पवार, संस्कृती कोकाटे, अभय कोकाटे, समृद्धी टेकाळे, आस्था टेकाळे, नेहा येवतकर, आरुष पुंड, राधिका राऊत, रिद्धी राऊत, कोमल राऊत, प्रगती कोकाटे तसेच नायगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील राधिका गोपाळ पांचाळ, अनन्या कुलकर्णी, राजवीर शितोळे, सार्थक गोरे, श्रावणी पवार, विराज पाटील, तनुष खंडागळे, चैतन्य शितोळे, अनुष्का मेनकुदळे, तेजस्विनी शिंदे, दिव्या माळी, समृद्धी मेनकुदळे, आरुषी गोरे या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच परिसरातील इतर शाळेतील विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप करण्यात येणार असल्याचे राऊत यांनी सांगितले. या कार्यक्रमास भाजपा युवा मोर्चाचे कळंब तालुका सरचिटणीस व वाठवडा ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ टिंगरे, दिलीप राऊत, प्रमोद पवार, शालेय समितीचे अध्यक्ष शरद पवार, अमोल कोकाटे, विलास साळुंखे, अमोल साळुंखे, राजेंद्र कोकाटे, नितीन टेकाळे, महादेव अल्टो, स्वप्निल पुंड, मनोज येवतकर, बळीराम नवगिरे, किरण कुंभार, गणेश कोकाटे, प्रवीण इरपतिगिरे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उमरगा येथे १५ जुलैं रोजी पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

धाराशिव दि.१३ (प्रतिनिधी) – रोजगार व स्वयंरोजगार धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सुशिक्षित बेरोजगार, नोकरी इच्छूक उमेदवारांना नोकरी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात येते.

याचाच एक भाग म्हणून दि.१५ जुलै रोजी सकाळी १० वाजता जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, धाराशिव व श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयांतर्गत आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र, उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे जिल्ह्यातील उमेदवारांसाठी जागतिक कौशल्य दिनाच्या निमीत्ताने पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात खाजगी क्षेत्रातील नामांकित ३४ उद्योजक, कंपनी, आस्थापना, कारखान्याचे प्रतिनिधी सहभागी होणार असून ते ५३१ पदासाठी उमेदवारांची निवड करणार आहेत. या रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी पात्र व नोकरी इच्छूक उमेदवारांनी कौशल्य विकास व रोजगार उद्योजकता विभागाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर जॉब सिकर रजिस्ट्रेशन (एम्प्लॉयमेंट नोंदणी) करुन वैयक्तिक माहिती, शैक्षणिक पात्रतेचा तपशील, आधार क्रमांक, मोबाईल, ई–मेल, पत्ता अद्यावत करावा. त्यानंतर रोजगार मेळाव्यात ऑनलाईन नोंदणी करावी. त्यामुळे या मेळावा व स्वयंरोजगार मार्गदर्शन मेळाव्यामध्ये जास्तीत जास्त इच्छूक उमेदवारांनी सहभागी व्हावे व अधिक माहितीसाठी कार्यालयाचा दूरध्वनी क्र. ०२४७२ – २९९४३४ वर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त संजय गुरव यांनी केले आहे.

## चोरीच्या मोटारसायकलसह आरोपीस केले जेरबंद

धाराशिव दि.१३ (प्रतिनिधी) – विविध ठिकाणाहून मोटारसायकलची चोरी केलेल्या एका गुन्हेगारास स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ४ वाहनांसह त्याच्या मुसक्या आवळल्या आहेत.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक जिल्ह्यातील माला विषयक गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेवून माला विषयक गुन्हे उघड व पाहिजे फरारी आरोपींचा शोध घेण्यासाठी पेट्रोलिंग करीत कळंब तालुक्यातील येरमाळा उडाणपुल येथे आले असता पथकास गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, धाराशिव शहर गुरंन २६४/२०२४ कलम ३७९ भा.द.वि.सं. कलम ३७९ मधील आरोपी सैफ इरफान यादगीर रा. सोलापूर हा नवीन घरकुल, कुंभारी ता. जि. सोलापूर हा त्याच्या राहत्या घराजवळ गल्लीत असल्याची अशी खात्रीशीर बातमी मिळाल्यावरुन पथकाने त्या ठिकणी जावून त्यास दुपारी ६.५० वाजण्याच्या सुमारास ताब्यात घेवून त्याचे नाव व गाव विचारले असता त्याने त्याचे नाव सैफ इरफान यादगीर रा. सोलापूर हा नवुन घरकुल, कुंभारी ता. जि. सोलापूर असे सांगितले. पथकाने नमुद गुन्ह्या संबंधाने त्याच्याकडे विचारपूस केली असता त्याने सांगितले की, मी धाराशिव येथून ३ व धाराशिव शहरच्या पुढच्या गावातून १ व अंबाजोगाई येथून १ अशा एकुण ५ मोटरसायकली चोरल्या असल्याचे सांगितले. त्यावरुन पथकाने गुन्हे अभिलेखाची पाहणी केली असता सदर मोटरसायकल बाबत धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुरनं २००/२०२४ भा.दं. वि.सं. कलम ३७९, २८९/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि.सं, धाराशिव ग्रामीण, गुरनं १६९ भा.दं.वि.सं. कलम ३७९, अंबजोगाई ग्रामीण जि. बीड, गुरनं २९८/२०२३ भा.दं. वि.सं. कलम ३७९ प्रमाणे गुन्हे नोंद असून दोन पंचा समक्ष त्या आरोपीच्या ताब्यातून नमुद गुन्ह्यातील १ लाख ३४ हजार रुपये किंमतीच्या ४ मोटारसायकल दि. ११ जुलै रोजी सायंकाळी ७.३० वाजता जप्त करुन पुढील कार्यवाहीसाठी गुन्ह्यातील मुद्देमालासह आरोपीस धाराशिव शहर पोलीसांच्या ताब्यात दिले. ही कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी व अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली सथानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार, सपोफौ काझी, पोलीस हवालदार काझी, पठाण, औताडे, पठाण, चालक पोलीस अंमलदार भोसले यांच्या पथकाने केली आहे.

## महाथेरो सुमेध बोधी यांना आंबेडकरी बांधवांच्यावतीने विनम्र अभिवादन



धाराशिव दि.१३ (प्रतिनिधी) – पूज्य भन्ते सुमेध बोधी महाथेरो यांचे निर्वाण झाले आहे. त्यामुळे श्रद्धांजली दि.१३ जुलै रोजी वाहण्यात आली.

पूज्य भन्ते सुमेध बोधी महाथेरो यांचे यवतमाळ जिल्ह्यातील नेर वटफळी येथे तर आजाराने निर्वाण झाले. त्यामुळे धाराशिव शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन स्मृती बुद्धविहार व भारतीय बौद्ध महासभेच्यावतीने करण्यात आले होते. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व सुमेध बोधी यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून पुष्प, दीप व धुपाने पूजन करून सामूहिक त्रिशरण, पंचशील घेऊन अभिवादन केले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, भीमशक्ती सामाजिक संघटनेचे मेसा जानराव, विजय बनसोडे, आरपीआयचे सोमनाथ गायकवाड, मुकेश मोठे, उदय बनसोडे, भालचंद्र कठारे, भारतीय बौद्ध महासभेचे स्वामीराव चंदनशिवे, राजाराम बनसोडे, बाबासाहेब कांबळे, महादेव एडके, प्रताप विधाते, नंदकुमार हावळे, आनंद गाडे, महावीर जानराव, गंगावणे, सुनील माळाळे, सुशील बनसोडे, योगेश वाघमारे, प्रज्ञावंत ओहाळ, नितीन अंकुशराव, महादेव भोसले, बंडा शिंगाडे, अतुल लष्करे, श्रीकांत मटकीवाले आदींसह आंबेडकरी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांचे आभार संदीप अंकुश यांनी मानले.

## नागरिकांनी ई- केवायसी केल्यास रेशन मिळणार नाही – डॉ.जाधव

धाराशिव दि.१३ (प्रतिनिधी) – तालुक्यातील नागरिकांना आता शासकीय योजनांच्या अनुदानाचा लाभ घेण्यासाठी ई–केवायसी करून घेणे अनिवार्य झाले आहे. गॅस सबसिडी असो किंवा बँकेत खाते सुरू ठेवायचे असो, केवायसी गरजेची असून आता रेशनवरील धान्य पाहिजे असेल तर ई–केवायसी करणेही शासनाने अनिवार्य केले आहे. तसेच ई–केवायसी नसेल तर मोफत योजनेतील धान्य व अनुदान मिळणार नाही. यासाठी शिधा पत्रिकाधारकांनी ई–केवायसी लवकर करून घ्यावी, असे आवाहन धाराशिव तहसीलच्या तहसिलदार डॉ मृणाल जाधव यांनी केले आहे. ई–केवायसी म्हणजे नो यूअर कस्टमर म्हणजे आपले ग्राहक जाणून घ्या, असा त्याचा अर्थ होतो. त्यामध्ये 'ई' जोडले तर इलेक्ट्रॉनिक नो युवर कस्टमर अशी त्याची ओळख होते. आता ही एक डिजिटल प्रक्रिया आहे. अंगठ्याचा,बोटांचा ठसा किंवा डोळ्यांचे स्कॅन करून पूर्ण केली जाते. सरकारने रेशन दुकानाच्या माध्यमातून मोफत धान्य,काही रेशन कार्डधारक यांना धान्याऐवजी त्यांचे बँक खात्यावर सबसिडी पाठविण्याचा निर्णय घेतला




या योजनेचा गैरफायदा घेतोय का ? यासाठीही ई–केवायसी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. गाव तेथे रेशन दुकान आहे. या रेशन दुकानदारांना प्रशासनाने जास्तीत जास्त ई–केवायसी पूर्ण करण्याबाबत निर्देश दिले आहेत. यासाठी मुदतही निश्चित करण्यात आलेली आहे. ज्या रेशन कार्डधारकांचे ई–केवायसी पूर्ण होणार नाहीत, त्यांचे धान्य किंवा सबसिडी बंद होऊ शकते. त्यामुळे रेशन दुकानात ई–केवायसी करून घ्यावी. धाराशिव तालुक्यात काही लाभार्थी ई–केवायसी करण्यापासून अनभिज्ञ असल्याचे दिसून येत आहे.

### रेशन दुकानात करता येते ई–केवायसी

ई–केवायसी म्हणजे काय व ती कोठे करायची,असा प्रश्न अनेक रेशनकार्डधारकांना पडतो. आपल्या गावातील म्हणजे आपण जेथे रेशनचे धान्य भरून घेतो तेथे बोट लावून ई–केवायसी करावी. धाराशिव तालुक्यात एकूण रेशनकार्ड लाभधारकांची संख्या २ लाख ७८ हजार ८३ आहे. त्यात २१ हजार २६८ नागरिकांचे ई–केवायसी झालेले आहे. तर २ लाख ५६ हजार ८१५ नागरिकांचे केवायसी बाकी आहेत. प्रशासनाने रेशन दुकानदारांना ई केवायसी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तर रेशन कार्डधारकांनी जेथे धान्य घेतो, त्या रेशन दुकानात जाऊन ई–केवायसी करून घेणे गरजेचे आहे. ई–केवायसी नसणाऱ्यांना यापुढे धान्य किंवा अनुदानास अडचण येऊ शकते असे डॉ जाधव यांनी सांगितले.

# संपादकीय

## ..तरच अपघात थांबतील

वाहन सुरक्षित चालविणे ही जबाबदारी आहे, याचा गंध नसेल, तर अपघात सुरूच राहणार. सापुताऱ्याजवळ एका आराम बसच्या चालकाचा निष्काळजीपणा दोन मुलांचे जीव घेणारा ठरला. हा चालक मालमोटारीला ओलांडून पुढे जाण्याचा प्रयत्न करत असताना बस दरीत कोसळली. मुंबईत वरळीमध्ये कल्याणीनगर अपघात प्रकरणाची पुनरावृत्ती झाली. याच्या दुसऱ्याच दिवशी पुण्यात बोपोडी परिसरात भरधाव मोटारीने हवालदाराला चिरडले आणि पिंपळे सौदागरमध्ये आणखी एका पोलिसाला दुचाकीच्या धडकेत जीव गमवावा लागला. या सर्व घटनांमध्ये साम्य आहे. ते म्हणजे वाहनचालकांची मुजोरी आणि बेपर्वा वृत्ती! असे मुजोर वाहनचालक कोट्यधीश अथवा अब्जाधीश असतील, तर माणसाच्या जिवाबरोबर माणुसकीचाही बळी गेल्याचे दिसेल. वरळीतील घटना त्याचे भीषण उदाहरण. राजकारणात भरभराट झाल्यावर अनेकांची केवळ माया वाढते असे नाही, तर त्यांचा उद्दामपणा देखील मोजमापाच्या पलीकडे जातो. वरळीत मिहिर शहाने घडविलेल्या अनर्थातून ते दिसले. मासेविक्री करणाऱ्या कावेरी नाखवा यांचा शहाच्या मस्तीमुळे शोचनीय मृत्यू झाला. ससून डॉक भागातून विक्रीकरता मासे खरेदी करून वरळीत परतताना नाखवा दांपत्याच्या दुचाकीस मिहिर शहाच्या आलिशान मोटारीने धडक दिली. मोटारीसमोर पडलेल्या कावेरी नाखवा यांना शहाने दोन किलोमीटरहून अधिक अंतरापर्यंत फरफटत नेले. या नीच वृत्तीचे वर्णन करणे कठीण! मिहिर शहा हा शिवसेना शिंदे गटाचा उपनेता राजेश शहा याचा मुलगा. मद्यपान करून मिहिर शहा स्वतः मोटार चालवीत असताना चालकाने अपघाताची जबाबदारी घ्यावी, यासाठी प्रयत्न झाल्याचे सांगण्यात येते. अपघातानंतर गायब झालेल्या मिहिर शहाला आता अटक झाली आहे. आपले पालक समाजात प्रभावी आहेत, त्यामुळे कायदा, नियम आपल्यासाठी नाहीत, ही धनदांडग्यांच्या, अनेक राजकारण्यांच्या मुलांची मानसिकता बनली आहे.

**पालकही जबाबदार**

याचे मूळ अर्थातच त्यांच्या पालकांच्या वर्तणुकीत आहे. कल्याणीनगरमध्ये अल्पवयीन मद्यपी आरोपीला वाचविण्यासाठी थेट रक्ताचे नमुने बदलण्यात आले, पोलिसांनी काळकाढूपणा केला. नागरिकांच्या संतापानंतर यंत्रणा हलल्या! दोन बळी घेणाऱ्या मुलाला निबंध लिहिण्याच्या दिलेल्या हास्यास्पद शिक्षेबद्दल बाल न्याय मंडळाचे कान उपटण्याची नागरिकांची माफक अपेक्षाही उच्च न्यायालयाकडून पूर्ण झाली नाही. अशावेळी बेमुर्वतखोर वृत्ती कशी ठेचली जाणार? मुंबई दुर्घटनेतील कावेरी नाखवा यांच्या पतीचा आक्रोश महाराष्ट्राने वाहिन्यांवर पाहिला. तो कोणाही संवेदनशील व्यक्तीला वेदना देणारा होता. मिहिर शहाला नागरिकांच्या ताब्यात द्यावे, ही नाखवा कुटुंबाच्या एका नातलगाने केलेली मागणी भावनेच्या भरात असली तरी तोच सर्वसामान्यांच्या मनातील सूर आहे. एक देवदूत हरवलेल्या मुलीला तिच्या पालकांपर्यंत सुखरूप आणून पोहोचवितो आणि काही वेळात भरधाव मोटारीमुळे त्याला जीव गमवावा लागतो, ही बोपोडीतील घटना सुन्न करणारी आहे. त्या घटनेत पोलिस दलातील समाधान कोळी यांचा मृत्यू झाला. एका कुटुंबाचा आधार हिसकावून घेणारा मोटारचालक अपघातानंतर घरी जाऊन झोपला होता! विकृतीशिवाय याला दुसरे नाव नाही! दुचाकीच्या धडकेत मरण पावलेले पोलिस सचिन माने वडिलांना रुग्णालयातून आपल्या बहिणीच्या घरी सोडून परतत होते. वाहन चालकांसाठी नियम किती कठोर आहेत याहीपेक्षा त्याची अंमलबजावणी कशा रीतीने होते हे महत्त्वाचे ठरते. अंमलबजावणीला लाचखोरीचे ग्रहण आहे. मुख्य रस्त्यांवर, मुख्य चौकांमध्ये किमान महानगरांमध्ये कॅमेरे आहेत. नियम तोडणारे चालक त्यात दिसतात, त्यांना दंडाची नोटीस येते; मात्र गंभीर गुन्ह्यांतील आरोपी शोधण्यासाठी कॅमेर्‍याच्या सुविधेचा जेवढा वापर होतो तेवढा वाहतूक नियम तोडणाऱ्यांना जरब बसावी म्हणून होत नाही. नियम धुडकावणाऱ्यांना दहशत बसेल या दृष्टीने कृती केल्याशिवाय मार्ग नाही. शासकीय यंत्रणांना कर्तव्याचा आणि अनेक घरांमधील कर्त्यांना नव्या पिढीवर संस्कार करण्याचा विसर पडला आहे. यातून आपण अराजकाला आमंत्रण देत आहोत. म्हणूनच कल्याणीनगर पाठोपाठ अपघात मालिका अखंड सुरू राहते!

# लोकसंख्या शिक्षण काळाची गरज

**( जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त विशेष लेख )**

११ जुलै आजचा दिवस जगभर जागतिक लोकसंख्या दीन म्हणून साजरा केला जातो. ११ जुलै १९८७ रोजी जगात पाच अब्जावे बालक जन्माला आले तेंव्हापासून हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून पाळला जातो. १९८७ ते २०२१ म्हणजे अवघ्या चोवीस वर्षात जगाची लोकसंख्या दोन अब्जांनी वाढून ती सात कोटींपर्यंत पोहचली याचाच अर्थ जगाची लोकसंख्या तुफान वेगाने वाढत आहे. भारतात तर लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे. मागील वर्षीच भारताने चीनला मागे सारून जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशात अव्वल स्थान प्राप्त केले आहे. मागील वर्षीच्या सुरवातीलाच तज्ज्ञांनी २०२३ साली भारत चीनला मागे सारून सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनेल असा अंदाज वर्तवला होता. मागील वर्षी म्हणजे २०२३ च्या एप्रिल महिन्यात युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंट या जागतिक लोकसंख्येचा अभ्यास करणाऱ्या संयुक्त राष्ट्र संघाच्या संस्थेने त्याची पुष्टी केली आहे. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंटने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भारताची लोकसंख्या चिनपेक्षा जास्त असून भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. भारताची लोकसंख्या १,४२८.६ दशलक्ष आहे तर चीनची लोकसंख्या १,४२५.७ दशलक्ष इतकी आहे म्हणजेच दोन्ही देशांच्या लोकसंख्येमध्ये २.९ दशलक्ष इतका फरक आहे. या अहवालात चीनच्या लोकसंख्या वाढीचा वेग घटत आहे तर भारताचा लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे असेही नमूद करण्यात आले आहे. आज भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपली लोकसंख्या तीस कोटी होती याचाच अर्थ मागील पंच्याहत्तर वर्षात आपल्या देशातील लोकसंख्या ११० कोटींनी वाढली. आज आपण लोकसंख्येत जगात पहिल्या क्रमांकावर पोहचलो आहोत अर्थात ही काही भूषणावह बाब नाही. देशाच्या सर्व समस्यांचे मूळ हे वाढत्या लोकसंख्येतच आहे.



झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे देशात अन्न, वस्त्र, निवारा, रोगराई आणि दारिद्र्य असे अनेक प्रश्न उदभवू लागले आहेत. विशेष म्हणजे देशाच्या प्रगतीत वाढती लोकसंख्या ही मोठा अडसर ठरत आहे. लोकसंख्या वाढीचा सर्व बाबींवर परिणाम होत असून विकासालाही खीळ बसत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील सर्व नागरिकांच्या मूलभूत गरजा भागवणेही सरकारला शक्य होत नाही. ही लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी शासनस्तरावरून पुरेसे प्रयत्नही केले जात आहेत. पण समाजातून अजूनही त्या प्रयत्नांना म्हणावी तशी साथ मिळत नाही. कुटुंब नियोजनाची मोहीम सरकारी पातळीवर प्रभावीपणे राबवली जात आहे ही दिलासा देणारी बाब असली तरी मुलगा व्हावा या हट्टापायी तीन ते चार अपत्यांना जन्म देणारे महाभागही समाजात आहेत. या आणि अशा लोकांमुळेच ही मोहीम वेग धरत नाही. लोकसंख्या नियंत्रणात आणायची असेल तर नव्या पिडीमध्ये लोकसंख्येविषयी योग्य दृष्टिकोन आणि जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी नव्या पीडिला लोकसंख्या शिक्षण दिले पाहिजे. अवघ्या २४ वर्षात जगाची लोकसंख्या पाच अब्जानी वाढली तर देशाची लोकसंख्या पंच्याहत्तर वर्षात ११० कोटींनी वाढली या वेगाने जर लोकसंख्या वाढत राहिली तर लोकसंख्येचा हा भार वसुंधरा पेलू शकणार नाही त्याचा परिणाम एकूणच मानवी जीवनावर काय होईल हे नव्या पीडिला समजावून सांगावे लागेल. देशातील लोकसंख्या जर नियंत्रणात आली नाही तर सर्वानाच अडचणींचा सामना करावा लागेल. आपण जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहोत. हे स्वप्न साकार करायचे असेल तर वाढत्या लोकसंख्येला आळा घालावाच लागेल हे नवीन पीडिला पटवून द्यावे लागेल. वाढत्या लोकसंख्येमुळे होणारे दुष्परिणाम, निर्माण होणाऱ्या समस्या याची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये चर्चासत्रांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करायला हवे. लोकसंख्या शिक्षण अप्रत्यक्ष सामाजिक शिक्षण आहे त्यामुळे केवळ तरुणांनाच नव्हे तर समाजालाही या शिक्षणाची गरज आहे. लोकसंख्या शिक्षण ही काळाची गरज आहे. लोकसंख्या वाढ रोखायची असेल, देशाला विकासाच्या मार्गावर न्यायचे असेल आणि देशाला महासत्ता बनवायचे असेल तर लोकसंख्या शिक्षणाला पर्याय नाही.

------------

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# महाराष्ट्राला मार्वल च्या माध्यमातून मिळणार आता कृत्रिम बुद्धिमत्तेची साथ..

आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा एआय हा सध्या तंत्रज्ञानातील सर्वात लोकप्रिय शब्दांपैकी एक झाला आहे. या तंत्रज्ञानाचा वापर सकारात्मक पद्धतीने केला तर मानवाचे जीवन सुकर होऊ शकते. याच उद्देशाने आता जगभर विविध क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर झपाट्याने वाढत आहे. महाराष्ट्र पोलीस दलालाही आता 'मार्वल' कंपनीच्या स्थापनेमुळे गुन्ह्यांची उकल गतीने करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड मिळाली असून भविष्यात सर्वच क्षेत्रात अग्रेसर राहण्यासाठी महाराष्ट्राला याचा मोठा लाभ मिळणार आहे.मागील काही वर्षात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून अनेक नवकल्पना निर्मित होऊन प्रगती साधली जात आहे. अनेक वर्षापूर्वी ज्या बाबी कल्पनेबाहेरच्या वाटत होत्या त्या वैज्ञानिक सिद्धांताद्वारे मान्य होऊन हळूहळू वास्तविकतेत रूपांतरित झाल्या. त्याचेच आजचे आधुनिक स्वरूप म्हणून आपण कृत्रिम बुद्धीमत्तेकडे पाहू शकतो.

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे मानवाप्रमाणे विचार करण्यासाठी आणि कार्य करण्यासाठी तयार केलेल्या संगणकामधील मानवी बुद्धिमत्तेचे अनुकरण म्हणता येईल. शिकणे, तर्क करणे, समस्या सोडवणे, समज आणि भाषेचे आकलन ही सर्व या संगणकीय क्षमतांची उदाहरणे म्हणता येतील. संगणक, संगणक-नियंत्रित रोबोट किंवा सॉफ्टवेअर बनवण्याची एक पद्धत आहे जी मानवी मन आणि बुद्धिप्रमाणे विचार करते. मानवी मेंदूचा अभ्यास करून आणि माहितीचे विषण करून त्याचे परिणाम दर्शविते. वास्तववादी आणि उच्च गुणवत्तेच्या प्रतिमा, व्हिडीओ आणि ऑडिओ तयार करण्यासाठी सुमारे एक दशकापूर्वी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर भारतात होऊ लागला. त्यासोबतच गुगल एआय, चॅट-जीपीटी आदी माध्यमातूनही याचा वापर वाढू लागला आहे. त्याचप्रमाणे सिरी किंवा अलेक्सा ही नावे सुद्धा परिचित झाली आहेत. या मशीन्स सुद्धा मर्यादित स्वरुपात कृत्रिम बुद्धिमत्तेचा भाग म्हणता येतील. मानवाप्रमाणे विचार करण्याची कृत्रिम बुद्धिमत्तेची क्षमता सिद्ध होऊ लागली आहे. सध्या चॅटबॉट्सने जगात वादळ आणले आहे. कॉर्पोरेट क्षेत्रात डेटाचे प्रशिक्षण दिले जाऊ लागले आहे. मोठमोठ्या कंपन्या दर्जेदार उत्पादन घेण्यासाठी आणि कामगारांना मदत करण्यासाठी याची मदत घेत आहेत. मानवी आकलनशक्ती आणि तर्कावर आधारित निर्णय घेण्याच्या क्षमतेच्या जोरावर जटील समस्यांचे निराकरण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जाऊ लागला आहे. गुन्ह्यांची उकल करण्यासाठी पोलीस दलाला याचा मोठा लाभ होऊ शकणार आहे. सद्यस्थितीत शासनाच्या विविध विभागांकडे प्रचंड प्रमाणात माहिती उपलब्ध असते. पोलीस दलाकडे गुन्हे आणि गुन्हेगारांसंबंधी माहिती मोठ्या प्रमाणावर येत असते. सायबर आणि आर्थिक स्वरुपाच्या गुन्ह्यांच्या संख्येतही मोठी वाढ होत असून नागरिकांच्या फसवणुकीचे नवनवीन मार्ग अवलंबिले जात आहेत. यात गुन्ह्यांचे प्रकार आणि गुन्हेगारांची संख्या देखील मोठी असते. प्रत्येक बाबीत विविध प्रकारे मानवी मेंदूच्या क्षमतेचा वापर करून आणि उपलब्ध माहितीचे विषण करून गुन्ह्यांची उकल करण्याचा प्रयत्न केला जातो. तथापि या माहितीचा वापर करून विषण



करायला आणि मनुष्याप्रमाणे निर्णय घ्यायला आधुनिक संगणकालाच शिकविले तर याचा मोठा लाभ होऊ शकतो. हाच धागा पकडून महाराष्ट्र पोलीस दलात एआयचा वापर करण्यासाठी स्पेशल पर्पज व्हेईकल स्थापन करुन पोलीस दलाला या कृत्रिम बुद्धीमत्तेची मदत मिळवून देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने १६ मार्च २०२४ च्या बैठकीत घेतला आणि त्या अनुषंगाने तातडीने पावले उचलून 'मार्वल' कंपनीची स्थापना करण्यात आली.कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करुन गुप्तवार्ता क्षमता भक्कम करण्यासाठी आणि अपराधांचा पूर्वानुमान लावण्याची क्षमता वाढविण्यासाठी तसेच राज्य पोलीस दलास कायदा अंमलबजावणीचे कार्य अधिक प्रभावीपणे करता यावे यासाठी राज्यात 'चरहरीरीहीर ठशीशरीलह रपव तळसळश्ररपलश षी एपहरपलशव डरु एपषेीलशाशपीं (चअठतएङ)' 'मार्वल' ही कंपनी स्थापन करण्यात आली आहे. कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये अशा प्रकारचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या कंपनीस शासनामार्फत ४ कोटी २० लाख रुपये प्रतीवर्ष याप्रमाणे पाच वर्षाकरिता १०० टक्के भागभांडवल देण्यात येणार असून भागभांडवलाचा पहिला हप्ता नुकताच वितरीत करण्यात आला आहे.

'मार्वल' स्थापन करण्याबाबत राज्य शासन, भारतीय व्यवस्थापन संस्था, नागपूर आणि मे. पिनाका टेक्नोलाजीज खाजगी मर्या. यांच्यात दि.२२ मार्च २०२४ रोजी त्रिपक्षीय करार करण्यात येऊन शासनाची ही कंपनी अधिनियम २०१३ खाली नोंदणीकृत करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्यासमोर पोलीस जिमखाना येथे नुकत्याच झालेल्या बैठकीत राज्याच्या मुख्य सचिव तथा गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक (अतिरिक्त कार्यभार), पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत याबाबतचे सादरीकरण करण्यात आले.

पोलीस दलाला कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड मिळाल्याने मशीनला माहितीचे विषण करून आणि मानवाप्रमाणे विचार करायला शिकवून गुन्ह्यांची उकल करण्यासाठी तसेच होणारे गुन्हे रोखण्यासाठी मोठा लाभ होऊ शकेल. त्याचबरोबर गुन्हेगारांची गुन्हे करण्याची पद्धत जाणून, उपलब्ध माहितीचे विषण करून कुठे गुन्हा घडू शकतो, कुठे कायदा व सुव्यवस्था बिघडू शकते आदी बाबींचे अनुमान आधीच लावता येऊ शकणार आहे.

या उपक्रमातील मे. पिनाका टेक्नोलाजीज खाजगी मर्या. ही चेन्नई स्थित कंपनी असून त्यांना भारतीय नौदल, गुप्तवार्ता विभाग, आंध्र प्रदेश, आयकर विभाग, सेबी आदी संस्थांना एआय सोल्युशन्स पुरविण्याचा अनुभव आहे. त्याचबरोबर नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या विशेषज्ञतेचा उपयोग व्हावा या उद्देशाने 'मार्वल' चे कार्यालय नागपूर येथे भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या आवारात आहे. पोलीस दलाच्या मागणीनुसार 'पिनाका' एआय सोल्युशन्स पुरवेल तर, भारतीय व्यवस्थापन संस्था संशोधन आणि प्रशिक्षणामध्ये सहकार्य करणार आहे. नागपूर (ग्रामीण) चे पोलीस अधीक्षक, भारतीय व्यवस्थापन संस्था, नागपूर चे संचालक हे या कंपनीचे पदसिद्ध संचालक असतील आणि मे.पिनाका टेक्नोलाजीज खाजगी मर्या.चे संचालक हे या कंपनीच्या संचालक मंडळावर असणार आहेत. तर नागपूर (ग्रामीण) चे पोलीस अधीक्षक हे पदसिद्ध मुख्य कार्यकारी अधिकारी असतील.देशात नावलौकिक असणाऱ्या महाराष्ट्र पोलीस दलाची कार्यक्षमता कृत्रिम बुद्धीमत्तेच्या वापरामुळे आणखी वाढणार असून सर्व प्रकारच्या गुन्ह्यांची उकल तातडीने होण्यासाठी हातभार लागेल, यात शंका नाही. 'मार्वल' थेट शासनाच्या गृह विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असणार आहे. त्यामुळे भविष्यात शासनाच्या इतर विभागांनाही कृत्रिम बुद्धीमत्तेचा लाभ मिळून महाराष्ट्र आणि पर्यायाने भारत देश विविध क्षेत्रात जगभरात अग्रेसर राहील, हे निश्चित.

-ब्रिजकिशोर झंवर


## उपदेशकथा
## ईश्वरनिष्ठा



एक ईश्वरभक्त होता. तो व त्याचे कुटुंब सन्मार्गी होते परंतु त्याला बायको व मुलांची फार काळजी वाटे. आपली मुले सज्जन आहेत पण बाहेरचे जग तसे नाही. आपल्या मुलांना बदमाश लोक फसवतील या काळजीने तो ग्रासला होता. एके दिवशी त्याची पत्नी त्याला म्हणाली, 'आपली मुलं इतकी गुणी आहेत व घरातही सर्व सुख असताना आपण नेहमी कसल्या चिंतेत असता?' त्यावर तो म्हणाला, 'आपली मुले गुणी व सज्जन आहेत पण या फसव्या जगात त्यांचा कसा निभाव लागणार, याची मला चिंता वाटते. त्यामुळे मला रात्री झोपही लागत नाही.' पत्नी म्हणाली, 'अहो, तुम्ही ईश्वराची भक्ती करता, शेवटपर्यंत तुम्ही अशी काळजी करत राहणार का?' तो म्हणाला, 'जेव्हा माझा मृत्यू जवळ आला आहे असे वाटेल तेव्हा मी देवाची प्रार्थना करेन की देवा, मी आता चाललो, तू अत्यंत दयाळू आहेस, माझी मुलं नीतिमान आहेत, तू त्यांचे दुष्टांपासून रक्षण कर.' हे ऐकून पत्नी म्हणाली, 'जी प्रार्थना तुम्ही शेवटी करणार, ती प्रार्थना आत्ताच करा, प्रपंचाचा सर्व भार त्या दयाळू ईश्वरावर सोपवून तुम्ही निर्भर राहा.'

कथा उपदेश : प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी झटा.

## राशी भविष्य



राशीभविष्य
११ जुलै २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण
प्रत्येक क्षेत्रात आपल्याला मान सन्मान मिळेल. शांत व विवेक बुद्धीने काम केल्यास यश मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल.

वृषभ : शुभ रंग:पांढरा,शुभ दिशा: पूर्व
व्यवसायात फायदा होईल त्यामुळे मन प्रसन्न राहील. चांगल्या बातम्या ऐकण्यास मिळतील, मान सन्मानात वाढ होईल. चातुर्याने काम केले तर आजचा दिवश शुभ आहे. विरोधकांपासून सावध रहा.

मिथुन : शुभ रंग:काळा, शुभ दिशा: उत्तर
न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत. घरातील वृध्द व्यक्तिंच्या आरोग्याची काळजी घ्या. अडकलेला पैसा मिळेल.

कर्क : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पूर्व
आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील. आपल्या कामकाजात बदल होण्याची शक्यता आहे. वाहन चालवतांना सावधानी बाळगा.

सिंह : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पूर्व
राजकीय कामे हातावेगळी होतील. जवळच्या व्यक्तीकडून उपयुक्त सल्ला मिळेल. धार्मिक कामात वेळ जाईल. आरोग्याची काळजी घ्या.

कन्या : शुभ रंग,पांढरा, शुभ दिशा:पूर्व
वाद विवाद किंवा भांडणामुळे आपले मानसिक संतलुन बिघडेल. व्यापार मध्यम राहील. नौकरांवर अतिविश्वास दाखवू नका. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा. मुलांच्या रोजगार विषयक काळजी मिटेल.

तुळ : शुभ रंग:निळा, शुभ दिशा:उत्तर
कौटुंबिक किंवा मालमत्ते विषयाच्या समस्या दूर होतील. पराक्रमामुळे विरोधक त्रस्त होतील. कर्ज घेण्यापासून दूर रहा. वहान चालवतांना सावधानी बाळगा.

वृश्चिक : शुभ रंग :गुलाबी, शुभ दिशा : पूर्व
सामाजिक मान सन्मान मिळाल्याने आनंदी रहाल. चैन करण्याकडे ओढा राहील. व्यापारात नवीन संबंध फायदेशीर ठरतील. वहान चालवतांना काळजी घ्या. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

धनु : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर
प्रभावशाली व्यक्तित्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल. आर्थिक लाभ झाल्याने आनंदी रहाल. रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

मकर : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर
मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल. नौकरी रोजगारात जबाबदारीनुसार काम करा. आर्थिक अडचणीमुळे मन त्रस्त राहील.

कुंभ : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा:दक्षिण
कुटुंबात मोठ्यांचे मार्गदर्शन मिळेल. कायद्यातील वादाचा निपटारा होईल. आर्थिक योग उत्तम आहेत. व्यवसायीक योजना गुप्त ठेवा.

मीन : शुभ रंग :पिवळा,शुभ दिशा:उत्तर
आपल्या कामाचे प्रतिफळ ताबडतोब मिळेल. कार्याचा विस्तार वाढून अनकूल परिस्थिती निर्माण होईल. काही महत्वपूर्ण निर्णय घ्याल. कोणाचाही राग करू नका.

११ जुलैला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर सुर्य व चंद्राचा दुहेरी प्रभाव आहे. तुमचा स्वभाव संवेदनशील व हळवा आहे. भाव :इतरांबल तुम्हाला मनापासून आपुलकी वाटते. सर्वांवर तुम्ही आपल्या प्रेमाची पाखर घालू पाहता. तुमचे बरेचसे उपक्रम इतरांची सामाजिक दु:खे दूर करण्यासाठी चाललेले असतात. तुम्ही कल्पक आहात. निर्मितीक्षमता व सर्जनशीलता तुमच्याजवळ आहेत. आकलनशक्ती सूक्ष्म आहे. समस्यांचा उलगडा तुम्हाला तात्काळ होतो. काही आदर्श, नीतिमूल्ये समाजात प्रस्थापित व्हावेत म्हणून तुम्ही प्रयत्नशील असता.

परिस्थितीचा स्वत:वर प्रतिकूल परिणाम करून घेण्यापेक्षा परिस्थितीला वळण देण्याचा प्रयत्न करा. अपयशामुळे मनाचा समतोल बिघडल्यास निसर्गसहवास स्फूर्तीदायक ठरेल. नैराश्य, काळजी, औदासीन्य यामुळे निद्रानाश, अल्सर सारखे विकार होतील. मनोबलासाठी ध्यानधारणा आवश्यक.

कार्यक्षेत्र : मुलांच्या बौध्दीक क्षमता, व्यवसायाभिमुखता व मानसिक कल यांचे मापन करणाऱ्या संस्थात उत्कृष्ट कार्य करू शकाल. व्यवसाय मार्गदर्शन, विवाहपूर्व वा विवाहोत्तर समुपदेशन, रिमांड होम, समाजकल्याण केंद्र या ठिकाणी सल्लागाराची भूमिका बजावता येईल. उदरविकारतज्ज्ञ, वनस्पती औषधाचे उद्योजक, मनोविश्लेषक, मानसोपचार तज्ज्ञ या जागांवर काम केल्यासही लौकिक मिळेल.

प्रणयी जीवन : आपल्या जोडीदाराकडून तुम्ही नेहमी आदर्श वागणुकीची अपेक्षा करता. आपल्या व्यथा, दु:खे समजून घेण्यासाठी त्याने पुरेसा वेळ काढावा असे तुम्हाला वाटते. आक्रमक प्रवृत्तीची, हट्टी, भांडखोर माणसे तुम्हाला आवडत नाहीत. म्हणून मार्च २१ ते एप्रिल २० मधील व्यक्ती टाळा. जुलै २१ ते ऑगस्ट २१ मधील व्यक्ती निवडा.

वर्षफळ : लोकांशी जोडलेले संबंध उपयुक्त ठरतील. कारखानदार उद्योगपती वगैरे मंडळीची मदत मोलाची ठरेल. जुलै ऑगस्ट मध्ये तांत्रिक नैपुण्य, संगणकविषयक पदविका संपादन करा. सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये उसन्या सेवेसाठी निवड होऊ शकेल. डिसेंबर जानेवारी मध्ये नोकरीत अधिकारपद चालून येईल. मार्च एप्रिल मध्ये मुलांच्या शैक्षणीक प्रगतीचा आलेख उंचावेल. मे जून मध्ये कुटुंबासमवेत तीर्थयात्रा, लांबचे प्रवास होतील.

महत्वाचे वर्ष : २, ११, २०, २९, ३८, ४७, ५६, ६५.
भाग्यरत्न : मोती
याच तारेखेची व्यक्ती : ना. ह. आपटे

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# वेगवान इंग्लिश गोलंदाज जेम्स अँडरसनचा क्रिकेटला गुड बाय

लंडन,-इंग्लंड आणि वेस्ट इंडिज यांच्यातील तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना क्रिकेटच्या मक्का समजल्या जाणाऱ्या लॉर्ड्सच्या मैदानावर खेळला गेला. या सामन्यात यजमान इंग्लंडनं एक डाव आणि ११४ धावांनी विजय मिळवला. या विजयासह इंग्लंडचा महान वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसननं आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा केलं आहे. अँडरसननं या त्याच्या शेवटच्या कसोटी सामन्यात पहिल्या डावात एक आणि दुसऱ्या डावात तीन विकेट घेतल्या. त्यानं ७०४ कसोटी विकेट्स घेऊन आपली कारकीर्द पूर्ण केली.अँडरसनची २२ वर्षांची क्रिकेट कारकीर्द : ४१ वर्षीय जेम्स अँडरसननं २००३ मध्ये लॉर्ड्सवरच झिम्बाब्वेविरुद्ध कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केलं होतं. तर डिसेंबर २००२ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध अँडरसननं एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण केलं होतं. तेव्हापासून तो १८८ कसोटी सामने खेळला आहे. फक्त 'क्रिकेटचा देव' सचिन तेंडुलकरनं अँडरसनपेक्षा जास्त कसोटी सामने खेळले आहेत. सचिनच्या नावावर २०० कसोटी सामने आहेत. अँडरसन हा ७०० कसोटी बळींचा टप्पा गाठणारा जगातील पहिला वेगवान गोलंदाज आहे. भारताविरुद्धच्या धर्मशाळा कसोटी सामन्यात कुलदीप यादवला बाद करुन अँडरसननं याचवर्षी ७०० बळी पूर्ण केले. यासोबतच जेम्स अँडरसननं १९४ एकदिवसीय सामने खेळले असून त्यात त्याच्या नावावर २६९ विकेट्स आहेत. अँडरसननं १९ टी २० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये १८ विकेट घेतल्या आहेत. अँडरसननं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये फलंदाजीत १६२७ धावा केल्या. अँडरसनच्या नावावर कसोटी क्रिकेटमध्ये एक अर्धशतक (८१ धावा) आहे.

कसोटीचा बॉस जेम्स अँडरसन : जेम्स अँडरसनन यापूर्वीच एकदिवसीय आणि टी २० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. आता कसोटीला अलविदा करण्यासोबतच त्यानं आंतरराष्ट्रीय क्रिकेटलाही निरोप दिला. जेम्स अँडरसननं आपल्या राष्ट्रीय संघाच्या यशात महत्त्वपूर्ण योगदान दिलं आहे,



## २२ वर्ष, ४०१ सामने, ९९१ विकेट्स

विशेषत: कसोटी सामन्यांमध्ये, जिथं त्याची आकडेवारी सर्वात प्रभावी आहे. त्यानं कसोटीत तब्बल १८८ सामने खेळताना एकूण ७०४ विकेट्स घेतल्या. जेम्स अँडरसन हा कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील एकमेव वेगवान गोलंदाज आहे, ज्यानं ७०० विकेट्स घेण्याचा पराक्रम केला. या कालावधीत त्यानं कसोटी क्रिकेटमध्ये ३२ वेळा पाच विकेट्स आणि तीन वेळा १० विकेट्स घेतल्या आहेत.शेवटच्या सामन्यात केले दोन मोठे विक्रम : जेम्स अँडरसननं आपल्या कसोटी कारकिर्दीत ४० हजाराहून अधिक चेंडू टाकले. ४० हजार किंवा त्याहून अधिक चेंडू टाकणारा तो कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील पहिलाच वेगवान गोलंदाज ठरला. यादरम्यान त्यानं त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील ५० हजारावा चेंडू देखील टाकला. हा पराक्रम करणारा तो जगातील एकमेव वेगवान गोलंदाज आहे.

सर्वाधिक कसोटी विकेट :

१. मुथय्या मुरलीधरन (श्रीलंका, १९९२-२०१०) : १३३ कसोटी - ८०० विकेट्स

२. शेन वॉर्न (ऑस्ट्रेलिया १९९२-२००७) : १४५ कसोटी - ७०८ विकेट्स

३. जेम्स अँडरसन (इंग्लंड २००३-२०२४) : १८८ कसोटी - ७०४ विकेट्स

४. अनिल कुंबळे (भारत १९९०-२००८) : १३२ कसोटी - ६१९ विकेट्स,५. स्टुअर्ट ब्रॉड (इंग्लंड २००७-२०२३) : १६७ कसोटी - ६०४ विकेट्स

६. ग्लेन मॅकग्रा (ऑस्ट्रेलिया १९९३-२००७) : १२४ कसोटी - ५६३ विकेट्सकसोटी क्रिकेटमध्ये

जेम्स अँडरसन : सामने : १८८

विकेट्स : ७०४, सरासरी : २६.४५

स्ट्राइक रेट : ५६.८ इकॉनॉमी रेट : २.७९

कसोटीच्या एका डावातील सर्वोत्तम कामगिरी : ७४२, कसोटी सामन्यातील सर्वोत्तम कामगिरी : ११७१, एका डावात पाच विकेट्स : ३२ वेळा

एका सामन्यात १० विकेट्स : ३ वेळा

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक चेंडू टाकणारे गोलंदाज : ६३१३२ चेंडू - मुथय्या मुरलीधरन (श्रीलंका) ५५३४६ चेंडू - अनिल कुंबळे (भारत)

५१३४७ चेंडू - शेन वॉर्न (ऑस्ट्रेलिया)

५०००१ चेंडू - जेम्स अँडरसन (इंग्लंड)

कसोटी क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक चेंडू टाकणारे वेगवान गोलंदाज : जेम्स अँडरसन (इंग्लंड) - ४००३७ चेंडू स्टुअर्ट ब्रॉड (इंग्लंड) - ३३६९८ चेंडू कोर्टनी अँड्र्यू वॉल्श (वेस्ट इंडिज) - ३००१९ चेंडूं ग्लेन मॅकग्रा (ऑस्ट्रेलिया) - २९२४८

कपिल देव (भारत) - २७७४०



# हार्दिक पांड्या कर्णधार, वर्ल्ड चॅम्पियन खेळाडू बाहेर... श्रीलंकेविरुद्ध अशी असेल टीम इंडिया

मुंबई,-भारत आणि झिम्बाब्वे दरम्यान पाच टी२० सामन्यांची मालिका खेळवली जात आहे. यातले तीन सामने झाले असून भारत २-१ अशा आघाडीवर आहे. आणखी दोन सामने खेळायचे बाकी आहेत. झिम्बाब्वे दौऱ्यानंतर टीम इंडिया श्रीलंका दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्यात टीम इंडियाचा तीन टी२० आणि तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळणार आहे. याची सुरुवात २६ जुलैपासून होणार आहे. श्रीलंकेविरुद्धच्या क्रिकेट मालिकेसाठी काही वर्ल्ड चॅम्पियन खेळाडूंना विश्रांती दिली जाण्याची शक्यता आहे.

प्रशिक्षक गंभीर आणि हार्दिक पांड्याची नवी सुरुवात-टीम इंडियाच्या मुख्य प्रशिक्षकपदी गौतम गंभीरची नियुक्ती करण्यात आली आहे. श्रीलंका दौऱ्यापासून गंभीरच्या नव्या जबाबदारीची सुरुवात होईल. टी२० वर्ल्ड कप जिंकल्यानंतर टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्माने टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती स्विकारली आहे. त्यामुळे श्रीलंका दौऱ्यात टी२० मालिकेसाठी भारतीय संघाची धुरा हार्दिक पांड्याकडे सोपवली जाऊ शकते. हार्दिक पांड्याला आव्हान असेल ते ऋषभ पंतचं. अपघातातून सावरत तब्बल १४ महिन्यांनी मैदानात कमबॅक करणाऱ्या पंतने टी२० वर्ल्ड कपमध्ये तुफान कामगिरी केली.

वर्ल्ड कप विजेत्या खेळाडूंना विश्रांती

श्रीलंका दौऱ्यासाठी टी२० वर्ल्ड कप विजेत्या खेळाडूंना विश्रांती दिली जाण्याची शक्यता आहे. रोहित शर्मा, विराट कोहली आणि रवींद्र जडेजाने टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यातून निवृत्ती पत्करली आहे. पण एकदिवसीय मालिकेतूनही त्यांना विश्रांती दिली जाण्याची शक्यता आहे. टीम इंडियाचा प्रमुख गोलंदाज जसप्रीत बुमराहही या मालिकेत खेळणार नाहीए.

या खेळाडूंना मिळणार संधी?

श्रीलंकाविरुद्धच्या मालिकेसाठी शुभमन गिल, यशस्वी जयस्वाल, ऋतुराज गायकवाड, सूर्यकुमार यादव आणि रिंकू सिंह यांना संधी मिळण्याची शक्यता आहे. संघात संजू सॅमसन आणि ऋषभ पंत हे दोन विकेटकिपर असतील. याशिवाय अक्षर पटेल आणि वॉशिंग्टन सुंदर या दोन ऑलराऊंडरला संधी मिळू शकते. तर कुलदीप यादव हा प्रमुख फिरकी गोलंदाज असेल. वेगवान गोलंदाजीची धुरा अर्शदीप सिंह, आवेश खान, मोहम्मद सिराज, खलील अहमद आणि मुकेश कुमार या युवा खेळाडूंच्या हाती असेल.

या खेळाडूंना संधी नाही?

झिम्बाब्वेविरुद्धच्या टीम इंडियात खेळणाऱ्या अभिषेक शर्मा, रियान पराग, तुषार देशपांडेला श्रीलंकेचं तिकिट मिळणं अवघड आहे. २०२६ च्या टी२० वर्ल्ड कप डोळ्यासमोर ठेऊन बीसीसीआय टीम इंडियाची नव्याने बांधणी करत असल्याचे हे संकेत आहेत.

श्रीलंकेविरुद्ध संभाव्य भारतीय संघ

शुभमन गिल, यशस्वी जायसवाल, ऋतुराज गायकवाड, सूर्यकुमार यादव, ऋषभ पंत (विकेटकीपर), संजू सॅमसन (विकेटकीपर), हार्दिक पांड्या (कप्तान), रिंकू सिंह, अक्षर पटेल, वाशिंगटन सुंदर, कुलदीप यादव, अर्शदीप सिंह, आवेश खान, मोहम्मद सिराज आणि खलील अहमदमुकेश कुमार.

## जाहीरनामा

**रेणापुर येथील सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर रेणापुर यांचे कोर्टात**

कोर्टाचा शिक्का

**किरकोळ दि. अर्ज क्र १४६/२०२४**

**प्रेमला इतर / निशाणी क्र**

**वारसाचे सर्टिफिकेट मिळणेबाबत**

ज्यापेक्षा नंदकुमार लक्ष्मणराव जाधव राहणार मोरवड ता. रेणापूर जि.लातुर, ता.१६/०३/२०२४ रोजी किंवा त्या सुमारास भोकरंबा ता. रेणापूर जि लातूर येथे मयत झाले आणि पुढील अर्जदारांनी ह्या कोर्टास सदरहू मयताचे वारस खालील अर्जदार

१. प्रेमला नंदकुमार जाधव, वय. ४६ वर्षे धंदा घरकाम रा. मोरवड ता. रेणापुर जि. लातूर २.वैष्णवी नंदकुमार जाधव, वय. १९ वर्षे धंदा शिक्षण, रा. मोरवड ता. रेणापुर जि. लातूर. ३. विक्रम नंदकुमार जाधव, वय. २१ वर्षे धंदा शिक्षण, रा. मोरवड ता. रेणापुर जि. लातूर. ४. हौसाबाई लक्ष्मण जाधव, वय, ७५ वर्षे धंदा घरकाम......अर्जदार यांनी सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे त्यापेक्षा सदरहू सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याने तारखेपासून एक महिन्यांचे आत त्याने हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू अर्जदार ह्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत नंदकुमार लक्ष्मण जाधव वारस सर्टिफिकेट देईल.

पुढील तारीख ०७.०८.२०२४

तारीख २५माहे ०६ सन २०२४

**क.लिपीक, सह.दि.न्या. क.स्तर, रेणापूर**

**सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय क स्तर रेणापुर**

## जाहीरनामा

**रेणापुर येथील सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर रेणापुर यांचे कोर्टात**

कोर्टाचा शिक्का

किरकोळ दि. अर्ज के १४४/२०२४

महानंदा इतर /-

निशाणी क.

**वारसाचे सर्टिफिकेट मिळणेबाबत**

ज्यापेक्षा ओंकाराप्पा लक्ष्मण बरुडे राहणार तळणी ता. रेणापूर जि. लातूर हे ता.११/०७/२०२३ रोजी किंवा त्या सुमारास तळणी ता. रेणापूर जि. लातूर येथे मयत झाले. आणि पुढील अर्जदारांनी ह्या कोर्टास सदरहू मयताचे वारस खालील अर्जदार- १. महानंदा ओंकाराप्पा बरुडे, वय-७३ वर्षे धंदा घरकाम, रा. तळणी ता. रेणापुर जि. लातूर, २.आदिनाथ ओंकाराप्पा बरुडे,वय. ५३ वर्षे धंदा शेती, रा. तळणी ता. रेणापुर जि. लातूर, ३. जगन्नाथ ओंकाराप्पा बरुडे,वय-४४ वर्षे धंदा शेती,रा. तळणी ता. रेणापुर जि. लातूर ४. नवनाथ ओंकाराप्पा बरुडे, वय. ४० वर्षे धंदा शेती रा. तळणी ता. रेणापुर जि. लातूर. ४. रमेश ओंकाराप्पा बरुडे वय. ५७ वर्षे धंदा शेती

रा. तळणी ता. रेणापुर जि. लातूर यांनी ..... अर्जदार

यांनी सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनामा तारखेपासून एक महिन्याने आत त्याने हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू अर्जदार हक्काबद्दल लागलीय पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहूं मयत ओंकाराप्पा लक्ष्मण बरुडे वारस सर्टिफिकेट देईल.


तारीख २५. गाहे ०६ सन २०२४,पुढील तारीख ०७.०८.२०२७

**क लिपिक सह दि. न्या क. स्तर, रेणापूर**

**सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर रेणापुर**

# अगोदर झहीर खान, एल. बालाजीच्या नावाची चर्चा, बॉलिंग कोच पदासाठी गौतम गंभीरच्या मनात वेगळे नाव







नवी दिल्ली -राहुल द्रविडच्या जागी भारतीय क्रिकेट संघाचा प्रशिक्षक म्हणून गौतम गंभीर याची नियुक्ती करण्यात आली आहे. गौतम गंभीरच्या सपोर्ट टीममध्ये कुणाला संधी मिळणार हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही. गंभीरच्या सपोर्ट स्टाफमध्ये बॅटिंग, बॉलिंग आणि फिल्डिंग कोच कोण असणार याबाबत चित्र स्पष्ट झालेलं नाही. एका रिपोर्टनुसार दक्षिण आफ्रिकेचा माजी वेगवान गोलंदाज मोर्ने मॉर्कल याचं नाव बॉलिंग कोच म्हणून चर्चेत आहेत. गोलंदाजी प्रशिक्षणाचा चांगला अनुभव मोर्ने मॉर्कलच्या नावावर आहे. याशिवाय भारताचा वेगवान गोलंदाज झहीर खान आणि एल. बालाजी यांची नावं देखील सुरुवात चर्चेत होती. आता गंभीरच्या नेतृत्त्वात भारतीय संघ श्रीलंकेच्या दौऱ्यावर जाणार आहे.क्रिकबझच्या रिपोर्टनुसार, गौतम गंभीरनं गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून मॉर्ने मॉर्कलच्या नावावर विचार करण्याची विनंती केली आहे. मॉर्कल टीम इंडियाचा बॉलिंग कोच व्हावा,अशी गंभीरची इच्छा आहे.यासंदर्भात मॉर्कल सोबत चर्चा देखील झाल्याची माहिती आहे.

गंभीरआणि मॉर्कल या दोघांनी लखनौ सुपर जायंट्ससाठी सोबत काम केलं आहे. गौतम गंभीर दोन वर्ष लखनौच्या संघाचा मेंटॉर होता. मॉर्कल अजूनही लखनौचा गोलंदाजी प्रशिक्षक आहे. मॉर्कलनं यापूर्वी पाकिस्तानचा गोलंदाजी प्रशिक्षक म्हमून देखील काम केलं आहे. २०२३ मध्ये भारतात झालेल्या वनडे वर्ल्ड कपमध्ये मॉर्कल पाकिस्तानचा गोलंदाजी प्रशिक्षक होता. त्या स्पर्धेनंतर मॉर्कलनं राजीनामा दिला होता. झहीर खान, बालाजीचं नाव चर्चेत -मॉर्कलच्या नावाशिवाय भारताचा माजी वेगवान गोलंदाज झहीर खान, एल. बालाजी, विनयकुमार यांच्या नावाची चर्चा सुरु आहे. बीसीसीआयकडून या नावांवर देखील विचार केला जात आहे. मात्र, अद्याप अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही. मॉर्कलचं आंतरराष्ट्रीय करिअर-मोर्ने मॉर्कलने २००६ ते २०१८ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळलं आहे. यादरम्यान दक्षिण आफ्रिकेसाठी त्यानं ८६ कसोटी, ११७ वनडे आणि ४४ टी२० इंटरनॅशनल मॅच खेळल्या आहेत.कसोटी त्याने ३०९ विकेट काढल्यात. यामध्ये ११० धावांवर ९ विकेट ही त्याची सर्वोत्तम कामगिरी आहे. वनडे मध्ये त्याने २५.३२ च्या सरासरीनं १८८ आणि टी२० इंटरनॅशनल मॅचेसमध्ये ४७ विकेट घेतल्या.

**DECLARATION IN CHANGE NAME AND ADDRESS**

I, HAVE CHANGE MY NAME FROM ZARGAR MOHD ABU FAIZ TO FAIZ KALEEM AHMED ZARGAR HENCE FROTHER DECLERATION WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE FAIZ KALEEM AHMED ZARGAR IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY HUSBAND, CHILDREN AND FAMILY.

**OLD NAME:** ZARGAR MOHD ABU FAIZ

**NEW NAME:** FAIZ KALEEM AHMED ZARGAR

**OLD ADDRESS**

NEAR KHALIL MEDICAL, PAIGAMBAR PURA UDGIR, LATUR

**NEW ADDRESS**

PAIGAMBAR PURA, KHADKALI GALLI, UDGIR PO UDGIR DIST LATUR

## जाहीर प्रगटन

लातूर जिल्हयातील विशेषतः मौजे कोळपा, ता. जि. लातूर लातूर येथील सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार १) सौ. उज्वला राचोटी स्वामी २) श्री. राचोटी चंद्रय्या स्वामी, दोघे रा. राघवेंद्र कॉलनी, लातूर यांनी अधिकृत केल्यावरुन व दाखविलेल्या कागदपत्रावरुन सर्वांच्या माहितीस्तव सदरील प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांना सौ. महादेवी पाराप्पा खानापुरे व संमती देणार पारप्पा विश्वंभर खानापुरे, रा. कोळपा, ता. जि. लातूर यांच्या मालकी व कब्जे वहिवाटीची मौजे कोळपा, ता. जि. लातूर येथील जमीन गट नंबर १४८/१ मधील एकूण क्षेत्र १ हे. ३७ आर आकार ५ रु.१६ पैसे मालकी क्षेत्र १ हे.३४ आर पैकी अंदाजे ० हे.११ आर. जमीन असुन याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस-गट नंबर १४८/१ पैकीचे क्षेत्र

येणे प्रमाणे वरील चतुः सिमेच्या आतील जमीन विक्री करण्याचा ठराव सौ. महादेवी पाराप्पा खानापुरे व संमती देणार पारप्पा विश्र्वंभर खानापुरे, रा. कोळपा, ता. जि. लातूर यांनी माझ्या पक्षकारासोबत केला असुन इसारापोटी काही रक्कम स्विकारलेली आहे. तसेच विद्यमान मालकाने सदर जमीनीवर कोणाचाही कर्ज बोजा, गहाणखत, न्यायालयीन वाद, वारसा हक्क, पोटगी हक्क, लिज, विक्रीचा करार, शेजाऱ्यांशी वाद अथवा इतर कसल्याही प्रकारचा वाद नसले बाबत जमीन मालकाने हमी दिली आहे. तरी सदरील जाहीर प्रगटन दिल्यापासुन १५ दिवसाच्या आत सदरील मिळकती बाबत इतर कोणाचेही हक्क संबंध, उजर, आक्षेप, हितसंबंध, कर्ज बोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्टडिक्री, तारण, लिज, शेजाऱ्याशी वाद शासकीय किंवा निमशासकीय कर्ज बोजा, न्यायालयीन वाद, इत्यादी प्रकारच्या हरकती असल्यास माझ्याकडे योग्य त्या कागदपत्रासह उजर / आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणाचा काही आक्षेप नाही आल्यास सदरील मिळकत निर्विवाद आहे असे समजुन आमचे पक्षकार खरेदीखताचा पुढील व्यवहार पुर्ण करतील याची नोंद घ्यावी. सदरील मुदतीनंतर आलेला आक्षेप आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहिर प्रगटन.

तर्फे

**जाहिर प्रगटन देणार**

**ॲड. शोएब अशफाक चौधरी**
**मो.नं.७०६६५५५६९५**

**१) सौ. उज्वला राचोओी स्वामी**
**२) श्री. राचोटी चंद्रय्या स्वामी**

## जाहीर प्रगटन

लातूर जिल्हा, रेणापूर तालुका व परिसरातील विशेषत रेणापूर येथील सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझे पक्षकार श्री. कोंडीबा मोहन जाधव रा. यशवंतवाडी ता. रेणापुर जि. लातूर येथील रहिवाशी असुन यांची जागा मालक शकुंतला कोंडीबा पारडे रा. रेणापूर ता. रेणापूर जि. लातूर यांच्या खरेदी मालकी कब्जेवहीवाटीची मौजे रेणापूर ता. रेणापूर जि. लातूर येथील नगर पंचायत नंबर ३५९८/अ पूर्ण लांबी दक्षीण उत्तर ४० फूट रुंदी पूर्व पश्चिमेस- २० फुट एकूण ८०० चौरस फुट ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे

पूर्वेस-देवशाला नागनाथ वाघमोडे यांची जागा, पश्चिमेस-निळकंठ चक्रे, दक्षिणोस-बिरु गायके यांची जागा उत्तरेस-२० फुट रुंदीचा रस्ता,येणे प्रमाणे वरोल चतुः सिमेच्या आतील खुली जागा माझे पक्षकार श्री. कोंडीबा मोहन जाधव रा. यशवंतवाडी ता. रेणापूर जि. लातूर यांनी कायमस्वरुपी खरेदी घेण्याचा लेखी ठराव साक्षीदारासमक्ष केलेला आहे. तसेच विक्री करणार मालक यांनी ठरावापोटी कांही रक्कम सुध्दा स्वीकारलेली असून विक्री करणार मालकी यांनी सदर खुली जागा ही निर्विवाद व निजोखीम असल्याची हमी माझे पक्षकार यांना दिलेली आहे, तरी सदर खुल्या जागे बाबत जर कोणाचा कांही उजर, हरकत, हक्कसंबंध, कर्जबोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्टडिक्री, मृत्युपत्र, तारण, लीज, कुछ शासकीय अथवा निमशासकीय कर्ज इत्यादी प्रकारचे हितसंबंध असतील तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासुन १५ दिवसाच्या आत योग्य त्या कागदपत्रासह आपला लेखी उजर / आक्षेप खालील पत्यावर दाखल करावा, मुदतीत कोणाचाही आक्षेप नाही आला तर सदरची खुली जागा निर्विवाद व निर्जाखमी आहे असे गृहीत धरुन सदरच्या खुल्या जागेचे नोंदणीकृत खरेदीखत माझे पक्षकार हे त्यांच्या हक्कात करुन घेईन व त्यानंतर आलेले उजर आक्षेप माझे पक्षकार यांच्यावर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेनी नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन

दिनांक ११/०७/२०२४

प्रगटन देणार

**श्री. कोंडीबा मोहन जाधव**

रा. यशवंतवाडी ता. रेणापूर जि. लातूर

मो. नंबर ९६८९०९०५३३


## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**

स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.

संपर्क 99 93 94 16 69 98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०-७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

# संताची पुण्यभूमी कानेगाव

भारतीय संस्कृती अतिशय पवित्र आणि उच्चतम आहे. ही पुण्यभूमी ऋषी, महर्षी तसेच सर्व श्रेष्ठ संताची पावन भूमी आहे. भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य म्हणजे विविधतेतून एकता. खरा धर्म हा मानवतावादी धर्म आहे. भारतीय संस्कृतीत सद्गुरुला फक्रारच महत्व आहे. म सद्गुरु वाचोनी सापडेना सोयफ . या संतोक्तीप्रमाणे सद्गुरू हा मार्गदर्शक, दिशादर्शक तत्वज्ञ असतो. दीपस्तंभासारखे सतत ज्ञानाचे , निती धर्माचे, आचरण चारित्र्य संवर्धन विषयी शिकवण देऊन आदर्श नागरिक घडवण्याचे कार्य करित असतात. ज्ञानपाथेय असतात सद्गुरू संकटे , अडचणी दूर करतात. संताचे जीवन हे मानव उद्धारासाठी असते. संत हे चालते- बोलते ज्ञानपीठ संस्कारक्षम असतात. गुरु म्हणजे तीर्थाचे रुप, गुरु म्हणजे संताचे स्वरूप, गुरु म्हणजे साक्षात बृम्हाचे रुप असतात. अशाच कानेगाव येथील संताचे संक्षिप्त स्वरूपात शब्दांकन करण्याचा अल्पसा प्रयत्न.

लातूर जिल्ह्यातील शिरुर अनंतपाळ तालुक्यातील कानेगाव हे गाव एक ऐतिहासिक महत्व असलेले लहानसे गाव आहे. कानेगावला सुप्रसिद्ध शिलालेख आहे. यावर संक्षिप्त रुपात कानेगावचे महत्व सांगितलेले आहे. परिसरातील गावांचे ही नावे आहेत. सुमारे आठशे वर्षापूर्वी यादव कुळातील राजा कृष्णदेवराय उर्फ्फ कान्हेरदेव हा सत्वशील राजा होऊन गेला. तो धार्मिक ही होता. ळ त्यांनी येथे यज्ञ केला होता. या यज्ञाच्या वेळी दानधर्म पण केला होता. तो निती धर्माला महत्व देत असे. तसेच कानेगावचा लातूर जिल्ह्यातील इतिहासातही नोंद केलेला आहे. कानेगावचे नाव कन्हेरगांव ऐवजी अपभ्रंश होऊन कानेगाव झालेझाले असावे असे वाटते. तेव्हा पासून कानेगाव नावाने ओळखले जाते. या शिलालेखावर साकोळ, उजळंब, तुरोरी आदी गावांचा उल्लेख केलेला आहे. या शिलालेखाचा अभ्यास सुप्रसिद्ध इतिहास संशोधक डॉ तुळपुळे यांनी सविस्तरपणे केलेला आहे. हेच कानेगाव आज संताची पुण्यभूमी म्हणून सुप्रसिद्ध झालेले आहे. येथे संत माधव पुरी महाराज , राजयोगिनी पार्वतीबाई गुरुमाऊली तसेच संत माधवदास महाराजांची समाधी आहे. म्हणून म्हटले जाते मगाथा त्रिवेणी संगमाची पुण्यभूमी कानेगावची म या संगमाची इतिहासाचे शब्दांकन आईसाहेब सौ. सुमनताई शिंदे यांनी ग्रंथ रुपाने प्रकाशित केलेली सोहपुरी महाराजासहीत समाधी असलेल्या तीन संताचे चरित्र , कार्य व जीवन इत्यादी स्वरूपात लिहून लोकापर्यंत माहिती पोहोचवण्याचे लेखिकेने केलेले आहे. त्यांचे ऋण व्यक्त करावे तितके कमीच आहे. त्यांच्या ऋणातच राहण्यात समाधान आहे.

महानयोगी सोहपुरी महाराज , श्री संत माधव पुरी महाराज, श्री संत पार्वतीबाई गुरुमाऊली व श्री संत माधवदास महाराज यांच्या पदस्पर्शाने व वास्तव्य पुनीत झालेल्या पावन भूमीत ध्यान आश्रम गुरुदेव मंदिर उभारले आहे. म- म्हणजे मंगल्य, दि - म्हणजे दिव्यता , र -म्हणजे रम्यता असे मंदिर ऐश्वर्या चे वैभवच म्हणावे असे मनोमन वाटते. दर वर्षी वर्षातून दोनदा श्री संत माधव महाराज यांची पुण्यतिथी कार्तिक वद्य चतुर्थीस आणि पार्वतीबाई गुरुमाऊली यांची पुण्यतिथी आषाढ वद्य चतुर्थीस मोठ्या भक्तीभावाने व आनंदमय उत्साही वातावरणात भजन, प्रवचन, कीर्तनाने साजरा केला जातोजातो व अन्नदानही केले जाते. म आनंदाचे डोही आनंद तरंग म अशा रमणीय वातावरणात उत्सवाची सांगता होते.

येथील संताच्या हत्तीबेटावरिल गंगागीर महाराज, शंभूउमरगा येथील दासगीर महाराज यांच्याशी जवळून संबंध आलेला आहे. हत्तीबेटावर दत्त जयंती उत्सव फक्रार मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. गंगागीर महाराज यांच्या ही एकादशीला कीर्तनाचा कार्यक्रम होत असतो. हत्तीबेटावर एक गुहा आहे या गुहेत माधव पुरी महाराज , राजयोगिनी पार्वतीबाई गुरुमाऊली यांनी नामस्मरण, ध्यान, मौन, तप, उपासना इत्यादी बाबतचा सखोल अभ्यास पूर्ण केलेला आहे. सत्संग केला जातो. गुहेच्या मागील बाजूस एक विहीर आहे तेथे पाणी आहे ही संत वास्तव्याने पुनीत अशी भूमी आहे. परिपूर्ण ज्ञान प्राप्ती झाल्यानंतर कानेगाव येथे ध्यान आश्रम गुरुदेव मंदिराची उभारणी केली आहे. संत माधव पुरी महाराजांची समाधी गोपाळपूर येथे आहे.

दानशूर, पालनकर्ता, निती धर्माने वागणारा सत्वशील राजा कानेगावचे अधिपत्य प्रत्यक्षात वास्तव्य म्हणजे कानेगाव पुण्यभूमी होय. सोहम पुरी महाराज श्री क्षेत्र पंढरपूर येथे नामस्मरण, ध्यान धारणा केले आहे. पुढील आयुष्य तेथेच राहून व्यतीत केले . शेवटी त्यांनी अंतीम स्वास मंगळवेढा येथेच सोडला. मंगळवेढा येथे देह ठेवला. अशा या थोर संताचा जन्म कानेगावात झाला आहे. भक्तीचा अंकूर येथेच जोपासला गेला. विश्वबीज सोहमपुरी महाराज यांनी तप, योग, साधना केली. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात माधव पुरी महाराजांचा जन्म झाला. पुढे विश्वबीज सोहमपुरी महाराज यांनी विदर्भ प्रांतातून हत्तीबेटावर आले येथून कानेगावला आले होते. भक्तीची, ज्ञानाची त्यांना प्राप्ती झाली होती. गुरुमाऊली पार्वतीबाई या शेवटच्या राहणाऱ्या कौटुंबिक संकटातून सावरल्या. आणि त्या कानेगावला अवतरन झाले.

पुढे वीस वर्षांनी श्री माधवदास महाराज यांचा जन्म करडखेलचा . पण तेही कानेगावला आले. या चारही संताचा कानेगावला आल्याचा हे योगायोगच म्हणावा लागेल. तप, साधना, ध्यान, मौन आदी माध्यमातून त्यांच्या शक्तीचा मळा कानेगावच्या पुण्यमय भूमीत दरवळला. हा परिसर भक्तीभावाने ऐश्वर्य संपन्न झाला.

योगेश्वर माधव पुरी महाराज यांना ध्यान धारनेसाठी झोपडी बांधून दिली. ध्यान आश्रम महादेव मंदिर शंभूउमरगा येथे दासगीर महाराजांच्या सहवासात चातुर्मास उत्सव साजरा केला.

महादेव वाडीचे तुकाराम सुडे पाटील यांच्या आई गंगुबाई सुडे पाटील हरिभजन सेवा पारायण गुरुमाऊली पार्वतीबाई यांची मनोभावे सेवा केली. गुरुमाऊली काही काळ येडसीलाही होत्या. श्री संत माधवदास महाराज यांनी त्यांना कानेगावला घेऊन आले.

त्यांनी कानेगावला भजन, कीर्तन, प्रवचन उत्सव सुरू केला. कानेगावच्या पुण्यभूमीत संताचे अवतरण झाले. संताची कर्मभूमी म्हणून कानेगवची प्रसिद्धी परिसरात आणि बाहेरही दूरपर्यंत पोहोचली आहे. कानेगाव भक्ताचे तीर्थक्षेत्र बनले. लवकरच पर्यटन क्षेत्र म्हणून नावारूपाला येणार आहे.

या चारही संताच्या लिला हया भाविक भक्तांच्या अंत:करणात श्रद्धा युक्त भावनेने साकार झालेल्या आहेत. अनेकांना अनुभव ही आलेला आहे. जी इच्छा झाली ती पूर्ण झालेली त्यांच्या अनुभवाला आली. श्रद्धा मनाभावापासून ठेवली तर अनुभवास येते यात शंकाच नाही. या संतांनी एकांतात ध्यान धारणा , अनुष्ठान केले आहे. ङ्ग भुता परस्परे पडो मैत्र जीवांचे ङ्ग या ज्ञानेश्वर महाराजांच्या पसायदानातील ओवीप्रमाणे पक्षी , प्राणी यांच्या सहवासात वावरले. एकांतात त्यांना ज्ञान प्राप्ती झाली आहे. कोरड्या विहिरीला पाणी, भक्तांच्या ज्या ज्या इच्छाची मागणी होती, त्या त्या साध्य झाल्या आहेत. आजही त्या संताच्या नामस्मरणाने भाविक भक्तांच्या मागण्या पूर्ण होत आहेत.

संताच्या पुण्यतिथीनिमित्त आषाढ वद्य चतुर्थीस आणि कार्तिक वद्य चतुर्थीस अशा वर्षातून दोनदा मोठ्या प्रमाणात महा उत्सव साजरा केला जातो, भजन, कीर्तनाने सप्ताह साजरा केला जातो. अन्नदानही मोठ्या प्रमाणात होतो. भाविक भक्त मोठ्या प्रमाणात लातूर, औरंगाबाद, मुंबई, पुणे, जालना येथून दर्शनासाठी येतात. प्रति पंढरपूर सारखे भक्तीमय रुपात गाव तुडुंब भरलेले दिसते. आदर्श शिक्षिका राधाबाई येडले यांनी सांगितले की गुरुमाऊली पार्वतीबाई यांच्या उत्सवात गावातील लेकी अन्नदानासाठी स्वखुशीने तयार होतात. आर्थिक सहाय्य करतात. या उत्सवात लेकी मोठ्या प्रमाणात सहभागी होतात.

कानेगावी येथे गुरुमाऊली पार्वतीबाई यांची ध्यान धारणा , अनुष्ठान केले जाते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जनजागृती साठी महाराष्ट्र भर फिरत असताना कानेगावला आले होते. त्यांनी गुरुमाऊली यांच्या झोपडीस मनोभावे भेट दिली असता त्यांना काव्य सुचले ते असे ङ्गया झोपडीत माझ्या ङ्ग या कवितेची रचना त्यांनी येथेच केलेली आहे. माधव पुरी महाराज , गुरुमाऊली पार्वतीबाई पंढरपूरला गेले असता त्यांना भारताचे भाग्यविधाते , शांती दूत पंडित जवाहरलाल नेहरू यांची भेट झाली. हा सुवर्ण योग्य म्हणावा लागेल.

कानेगावच्या लोकांचे संताच्या पदस्पर्शाने व वास्तव्याने पुण्यमय झाली आहे.ही भूमी पुण्यमय झालेली आहे. या संताच्या येण्याअगोदर गावच्या लोकांची आर्थिक स्थिती बिकट होती. दैनंदिन गरजा भागविणे अवघड होती. संताच्या वास्तव्याने लोकांची आर्थिक स्थिती सुधारली. लोक सुखी झाले, शिकून सवरुन येथील लोक शासकीय, निमशासकीय सेवेत कार्यरत झाले आहे. ही किमया संताच्या आशिर्वादानेच. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्राम गीतेचे वाचन, पारायण येथे केले जाते. ग्रामगीता ही ग्रामीण भागाचा विकास करणारी नवसंजीवनी आहे.

कानेगाव येथे संत एकनाथ महाराज नांदेड जिल्ह्यातील असून ते कानेगावला आले होते. त्यांना येथील संताच्या वास्तव्याने पुणीत झालेल्या भूमी विषयी त्यांच्या मनाला उपरती झालीझाली आणि येथेच स्थायिक झाले होते. संत एकनाथ महाराजाने तन, मन, धनाने आपले आयुष्य देवस्थान साठी चंदनाप्रमाने झिजवत आहेत ही गौरवाची बाब आहे.

संताच्या पुण्यभूमीची तसेच संताचा महिमा सांगणारी सविस्तर व सखोल माहिती ग्रंथाच्या रुपात लिहिली आहे. लेखिका सुनीताताई एकनाथराव शिंदे ( दहिकळंबेकर) यांनी गाथा त्रिकोणी संगमाची पुण्यभूमी कन्हेरगावची गाथा साध्या सरळ सोप्या भाषेत आहे. सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत आहे. तसेच गुरुदेव गीता ( श्री गुरुदेव व संत माधवदास महाराज संवाद) अभंग गाथा भाग - २ काव्य रुपात ग्रंथाची रचना केली आहे. अभंग भक्तीमय असून आशयपूर्ण आहेत. संस्थानाने प्रकाशित केलेली आहे. राजयोगिनी पार्वतीबाई गुरुमाऊली यांनी संत माधव पुरी महाराज यांचे जीवन चरित्र लिहिले आहे. संपादन सहाय्य श्री महेंद्र बंडले / सौ. राधा येडले यांनी केले आहे. तिन्ही ग्रंथ वाचकांसाठी संग्रही ठेवण्यासाठी आवश्यक आहेत. प्रकाशिका सौ. राधा येडले हया तिसऱ्या पुस्तकाच्या आहेत. देवस्थान मध्ये समाधी स्थानी नंदादीप तेवत असतो. ॲड. गुणाले यांची प्रस्तावना उत्तम आहे. संत एकनाथ महाराज यांची भेट श्री बंडले व सौ. राधा येडले यांनी घडवून आणली.

संताचे दर्शन मला माझ्या स्वग्रही घडले. फक्रार मोठे भाग्य मला व माझ्या कुटुंबीयांना लाभले. ॲड. गुणाले यांच्याही भेटीचा योग आला. ते संस्थान कमिटीचे अध्यक्ष ही आहेत. सर्वांचा मी ऋणी आहे.

शब्दांकन
**आर. जी. नरले**
एकुरका रोड ता. उदगीर जि. लातूर

# एकुर्का येथे कृषी कन्यांद्वारे शुन्य ऊर्जा शीत कक्षाचे प्रात्यक्षिक



**उदगीर (प्रतिनिधी)** वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी संलग्न डोंगरशेळकी तांडा ,कृषी महाविद्यालयातील सातव्या सत्रातील ,कृषीकन्यांनी ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत एकुर्का गावातील शेतकऱ्यांना शून्य ऊर्जा शीत कक्षाचे महत्व प्रात्यक्षिकासह समजावून सांगितले. या अंतर्गत एकुर्का येथील शेतकऱ्यांना शीतगृहाचे महत्त्व पटवून दिले गेले. या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांना फक्रायदा होणार असून भाजीपाला जास्त काळ टिकवणे शक्य होणार आहे .
शून्य उर्जेवर आधारित शीत कक्षाची उभारणी कमी खर्चात आणि सहज उपलब्ध होणाऱ्या वस्तूंचा वापर करून करता येते. या शीत कक्षाचा वापर करून फळांचा आणि भाजीपालांचा साठवण कालावधी वाढवता येतो.

शीत कक्षाची उभारणी करण्यासाठीं आवश्यक वस्तू :- १५० ते २०० विटा, बारीक वाळू, बांबू ,सुतळी इत्यादी वस्तूंची गरज असते व त्याद्वारे शेतकरी सहज पद्धतीने शीतकक्ष उभारणी करू शकतात. फळे व भाज्या कमी तापमान व योग्य आद्रतेमध्ये साठवल्यास रासायनिक क्रियांचा वेग मंदावतो .त्यामुळे फक्रळांचा व भाज्यांचा साठवण कालावधी वाढण्यास मदत होते. या शीतगृहामध्ये पालेभाज्या, फक्रळभाज्या चार ते पाच दिवस टिकुन राहत असल्याने शेतकऱ्यांना नुकसान टळणार असल्याचेही पटवून दिले. असे वातावरण तयार करण्यासाठी शीतगृहाची आवश्यकता भासते ही ती सर्व माहिती ग्रामीण भागात ग्रामीण कार्यक्रमांतर्गत देण्यात आली.

या उपक्रमा मध्ये कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंगद सूर्यवंशी ,कार्यक्रम समन्वयक डॉ. शिवशंकर वानोळे ,विषयतज्ञ प्रा. महेश लोंढे ,तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा. स्नेहा मून ,यांचे मार्गदर्शन लाभले. यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थिनी सुप्रिया पालटवाड ,पंढरपूरे वैष्णवी, लोणकर नंदिनी,पाटील वैष्णवी, व कांबळे अंजली यांनी शेतकऱ्यांना शीत कक्षाचे प्रात्यक्षिक करून दाखवले.


## DECLARATION IN CHANGE NAME AND ADDRESS

I, HAVE CHANGE MY NAME FROM **ZARGAR MOHD ABU FAIZ TO FAIZ KALEEM AHMED ZARGAR** HENCE FROTHER DECLERATION WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE **FAIZ KALEEM AHMED ZARGAR** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY HUSBAND, CHILDREN AND FAMILY. I HAVE MY OLD NAME: **ZARGAR MOHD ABU FAIZ**
MY NEW NAME: **FAIZ KALEEM AHMED ZARGAR**
OLD ADDRESS: **NEAR KHALIL MEDICAL, PAIGAMBAR PURA UDGIR,LATUR**
NEW ADDRESS: **PAIGAMBAR PURA, KHADKALI GALLI, UDGIR PO UDGIR DIST LATUR**

## टी.सी हरवली आहे

माझी विराज बालाजी देवकत्ते या नावाची इ. १ ली पासची टि.सी दि. १०/०७/२०२४ रोजी उदगीर ते अहमदपूर बस प्रवासात हरवली आहे. जर कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधवा.
मो.नं. ९२८४६४२१९२

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.बी.आर.झेंडे, ४ थे दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर
दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २९२/२०२४ निशाणी क्रमांक १२

ज्याअर्थी नामे Laxmibai Gopalrao Kanche हे दिनांक २४.०२.२०१५ रोजी Udgir Tal- Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार
1) Vitthal Gopal Kanche, Age 62 yrs. Occu. Pensioner
Address- R/o Ganga Nagar, Udgir Tq.Udgir dist.Latur
2) Mahadev Gopal Kanche, Age 60 yrs, Occu. Business
R/o Ganga Nagar, Udgir Tq.Udgir dist.Latur
3) Prakash Gopalrao Kanche, Age 55 yrs, Occu. Labour
3.1) Jankabai Gopalrao Kanche, Age 52 yrs, Occu. Homemaker
3.2) Amol Gopalrao Kanche, Age 32 yrs, Occu. Labour
3.3) Avinash Prakasha Kanche, Age 32 yrs, Occu. Labour
3.4) Anita Prakash Kanche, Age 28 yrs, Occu. Laobur
R/o Ganga Nagar, Udgir Tq.Udgir dist.Latur
4) Shanta Devrao Dhotre, Age 52 yrs,Occu. Homemaker,
R/o Ausa Road, Latur Tq.Udgir Dist.latur
5) Shila Shivaji Ulmule, Age 48 yrs, Occu. Homemaker
R/o. Khopegaon Tq. Pragati Nagar, Latur

यांनी खालील नमूद व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून

| Sr.No. Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|
| 1) Vitthal Gopal Kanche | 62 | Son |
| 2) Mahadev Gopal Kanche | 60 | Son |
| 3) Prakash Gopalrao Kanche | 55 | Son |
| 3.1) Jankabai Gopalrao Kanche | 52 | Daughter in law |
| 3.2) Amol Gopalrao Kanche | 32 | Grandson |
| 3.3) Avinash Prakasha Kanche | 30 | Grandson |
| 3.4) Anita Prakash Kanche | 28 | Grandson |
| 4) Shanta Devrao Dhotre | 52 | Daughter |
| 5) Shila Shivaji Ulmule | 48 | Daughter |

अर्जदार याने Laxmibai Gopalrao Kanche या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Laxmibai Gopalrao Kanche यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांकः ११/०७/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः १२/०८/२०२४

आदेशावरुन
(ए.बी.सुर्यवंशी) कनिष्ठ लिपिक ४ थे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
(एम.एल.सुत्राळे) सहा.अधिक्षक, ४ थे सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## झाडे लावा झाडे जगवा

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.एन.जे. चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर
दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४९५/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे 1) Abdul Vahid Mahetabsab Shaikh हे दिनांक १२.१२.२०२२ रोजी At. Udgir, Tq. Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत. व अर्जदार
1) Nuroddin Wahid Shaikh, Age 65
2) Maheboob Wahidsab Shaikh, Age 63
3) Akram Wahid Shaikh Age 50
4) Shaikh Atikh Vahid Age 48
5) Baligabegum Jahangir Pathan Age 58
6) Siddiqui Shakera Begum Rafiq, Age 45
7) Latifabai Gausoddin Pathan, Age 54
8) Rajapatel Sabihabegum Vahid, Age 44
All R/o At Bamani, Tq.Udgir Dist. Latur

यांनी खालील नमूद हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|
| 1) Nuroddin Wahid Shaikh | 65 | Son |
| 2) Maheboob Wahidsab Shaikh | 63 | Son |
| 3) Akram Wahid Shaikh | 50 | Son |
| 4) Shaikh Atikh Vahid | 48 | Son |
| 5) Baligabegum Jahangir Pathan | 58 | Daughter |
| 6) Siddiqui Shakera Begum Rafiq | 45 | Daughter |
| 7) Latifabai Gausoddin Pathan | 54 | Daughter |
| 8) Rajapatel Sabihabegum Vahid | 44 | Daughter |

अर्जदार याने 1) Abdul Vahid Mahetabsab Shaikh या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह 1) Abdul Vahid Mahetabsab Shaikh यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांकः ११/०७/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः १६/०८/२०२४

आदेशावरुन
(डी.ए.कांबळे) कनिष्ठ लिपिक ३ रे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
(एल.एम.सुत्राळे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.जे.सी.गुप्ता, सह दिवाणी न्यायालय क. स्तर, उदगीर यांच्या न्यायालयासमोर
दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४९७/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Dynanu S/o. Tukaram Waghmare हे दिनांक ०२.०६.१९६७ रोजी Ravankola Tq.Jalkot Dist.latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार
Rajabai W/o Tukaram Waghmare, Age 65, yrs, Occu. H.H.
R/o. Ravankola Tq.Jalkot Dist.Latur

यांनी खालील नमूद १ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|
| 1) Rajabai W/o Tukaram Waghmare | 65 | Wife |

अर्जदार याने Dynanu S/o. Tukaram Waghmare या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Dynanu S/o. Tukaram Waghmare यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांकः ०८/०७/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः १४/०८/२०२४

आदेशावरुन
(संतोष डी. शिंदे) कनिष्ठ लिपिक सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
(एल.एम. सुत्राळे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर
दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४९४/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Suresh S/o. Kerba Motiram हे R/o. Udgir Tq.Udgir Dist.Latur दिनांक १५/१०/२०२३ रोजी At. Mumbai येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार
1) Devita W/o. Suresh Motiram, Age 51 Occu. H.H.
2) Anshula D/o Suresh Motiram, Age 23 Ocu. Education
Both R/o Infront of Railway Satation, Udgir Tq.Udgir Dist.Latur
A/p Andheri East Mumbai

यांनी खालील नमूद २ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|
| 1) Devita W/o. Suresh Motiram | 51 | Wife |
| 2) Anshula D/o Suresh Motiram | 23 | Daughter |

अर्जदार याने Suresh S/o. Kerba Motiram या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Suresh S/o. Kerba Motiram यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांकः ०८/०७/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः २०/०८/२०२४

आदेशावरुन
(के.डी.सुर्यवंशी) कनिष्ठ लिपिक २ रे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
(एम.एल. सुत्राळे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY
११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो




## उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय
भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेद्रे सचिव






# दयानंद विज्ञान महाविद्यालयात 'भारतीय सशस्त्र दलातील संधी' या विषयावर मार्गदर्शन

लातूर : दि.१२ जुलै २०२४ रोजी मुंबई येथील महाराष्ट्र नौदल क्षेत्र मुख्यालयातील टीम लीडर कमांडर बलकार सिंग व भारतीय नौदलातील १४ कर्मचाऱ्यांनी दयानंद शिक्षण संस्थेस आणि दयानंद शिक्षण संस्थेतंर्गत असलेल्या दयानंद विज्ञान,कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या एनसीसी कॅडेट व विद्यार्थ्यांस संवाद साधला व मराठवाडा एनसीसी संवादातून भारतीय नौदलाच्या त्यांच्या कार रॅलीचे आगमन झाले.याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,सचिव रमेश बियाणी, कोषाध्यक्ष संजय बोरा,विशाल अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.मुख्यालय महाराष्ट्र नौदल क्षेत्र,मुंबईने मराठवाडा क्षेत्र,विदर्भ व कोकण प्रदेशात तीन कार रॅली काढल्या आहेत.याचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सशस्त्र दला संदर्भात जनजागृती करणे हा आहे.

याचबरोबर दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने दयानंद शिक्षण संस्थेच्या सभागृहात ' भारतीय सशस्त्र दलातील संधी ' या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आलेले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते.या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई येथील महाराष्ट्र नौदल मुख्यालयातील टीम लीडर कमांडर बलकार सिंग,कर्नल कमांडिंग ऑफिसर,५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी,लातूरचे वाय.बी.सिंग,दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर,उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे,लेफ्टनंट कमांडर क्षितिज यादव,लेफ्टनंट कमांडर किरण चंद्रशेखर,कार्यक्रम समन्वयक व भौतिकशास्त्र व एनसीसी विभाग प्रमुख कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी,लेफ्टनंट प्रा.विवेक झंपले,लेफ्टनंट डॉ. साईनाथ उमाटे,पिटी ऑफिसर अभिषेक कुमार सिंह,लिडिंग सिमन एस यादगिरी,लान्स कॉरपोरल ऑफ मरिन्स प्रफुल्ल,सिमन ग्रेट-१ वीर सिंग परदेसी,कपिल गढवाल,अग्नीवीर सिमन श्रीकांत पैठणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे कमांडर बलकार सिंग यांनी भारतीय सशस्त्र दलातील संधी तसेच नौदलातील आर्टिलरी,एअर फोर्स स्टेशन व वेगवेगळ्या प्रकारच्या नौदलातील नौका आणि टेक्नॉलॉजी याविषयी सखोल असे मार्गदर्शन केले.याचबरोबर लेफ्टनंट कमांडर अभिमन्यू मान,पंकज कुमार,आनंद पटाले,अमरेल गिल यांनीही दहावी,बारावी,पदवी व पदव्युत्तर कोणत्याही शाखेतील म्हणजे कला,वाणिज्य आणि विज्ञान अशा शाखेतील विद्यार्थ्यांनाही सशस्त्र दलात नोकरीच्या अनेक संधी आहेत आणि त्या संधीचे सोने अथक परिश्रमातून केले पाहिजे असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड यांनी वायुसेना,नौदल व थलसेना यामध्ये भरती होऊन एनसीसी कॅडेट व विद्यार्थ्यांनी देश सेवा करावी असे सांगून राष्ट्रभक्तीची जोपासना करावी असे सांगितले.

प्रास्ताविकातून उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांनी विद्यार्थ्यांना भारतीय सशस्त्र दलातील नोकरीच्या संधीची माहिती व्हावी आणि विद्यार्थ्यांनी तेथे भरती होऊन सैन्यशक्तीमध्ये टेक्नॉलॉजीचा वापर कसा करावा व देशभक्ती कशी केली पाहिजे या उद्देशातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असे



त्यांनी सांगितले तर कर्नल वाय.बी.सिंग यांनी आभार मानले. कर्नल एच.ए. जोशी यांनीही या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शुभेच्छा दिल्या.सूत्रसंचालन लेफ्टनंट प्रा.विवेक झंपले यांनी केले. याप्रसंगी सुभेदार मेजर शंभू सिंह, सुभेदार हरिंद्र सिंह, पशमिया, उत्तम पाटील, बाजीराव पाटील, बीएचएम शिवशंकर, हवालदार हरिंद्र कुमार, कोकितकर रामदास, अमित जाधव,टी राहुल, हिरा सिंह यांच्यासह इतर प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## साहित्यभारती लातूर जिल्हा शाखेच्या वतीने महाकवी कालिदास यांचा साहित्यवेध घेणारे व्याख्यान संपन्न

लातूर : आषाढस्य प्रथम दिवसे या महाकवी कालिदास दिनानिमित्त लातूर जिल्हा 'साहित्यभारती'च्या वतीने दुरदृश्यप्रणाली माध्यमाद्वारे महाकवी कालिदास यांच्या साहित्याचा परिचय करुन देणारे संस्कृत साहित्याचे गाढे अभ्यासक प्रा.रमेश स्वामी यांचे अभ्यासपूर्ण व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

'कविकुलगुरु' म्हणून गौरविले गेलेले संस्कृत साहित्यातील महाकवी कालिदास यांची चरित्रविषयक माहिती फारशी उपलब्ध नाही.महाकवी कालिदासांचा जन्म, त्यांचा काळ, चरित्र यांविषयी बरेच मतभेद व विविध मान्यता आहेत. 'मेघदूत' हे त्यांचे अतिशय प्रसिद्ध काव्य. त्याच्या सुरुवातीला पहिल्या ओळीत ऋआषाढस्य प्रथम दिवसे' असे वर्णन केलेले असल्यामुळे हा दिवस महाकवी कालिदास यांना समर्पित करण्यात आला आहे. म्हणून हीच तिथी त्यांची स्मृती तिथी म्हणूनही ओळखली जाते. 'आषाढ प्रतिपदा' हा दिवस 'कालिदास दिन' म्हणून साजरा केला जातो. संस्कृत साहित्यातील कालिदास हे असे एकमेव साहित्यकार आहेत की, ज्यांच्या काव्यातील एका उल्लेखामुळे तो दिवस त्यांच्या नावाने ओळखला जातो.असे दिनाचे औचित्य सांगत प्रा. डॉ. सुनीता सांगोले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडले.

प्रमुख व्याख्याते प्रा.रमेश स्वामी यांनी कालिदासांच्या चरित्रविषयक कथांचे उल्लेख करत कालिदासांच्या सप्त साहित्यात उल्लेखित तीन नाटके, दोन खंडकाव्ये आणि आणि दोन महाकाव्यांचा अल्प परिचय करुन दिला. रघुवंश, कुमारसंभव ही महाकाव्ये. शाकुंतल, मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशिय ही नाटके, मेघदूत हे खंडकाव्य आणि ऋतूसंहार हे आणखी एक काव्य. याशिवाय अनेक ग्रंथनिर्मितीत कालिदासाचा हातभार लागला असण्याची शक्यता आहे,असे मत प्रतिपादन केले. कालिदास हे संस्कृतमधील सर्वश्रेष्ठ कवी असून त्यांचे मूळ साहित्य संस्कृतात असले, तरीदेखील अनेक मराठी साहित्यिकांनी त्याचा मराठीत रसाळ भावानुवाद केलेला आहे. महाकवी कालिदासांवरील या प्रा.स्वामी यांच्या व्याख्यानास रसिक प्रेक्षकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला.

# विकासाच्या माध्यमातून कव्हा हे गाव महाराष्ट्रात क्रमांक एकचे करू

लातूर / प्रतिनिधी- विकासाच्या माध्यमातून कव्हा गावाचा चेहरामोहरा बदलण्याचे काम केलेले आहे. रस्ते, शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, पशुवैद्यकीय दवाखाना, शासकीय कार्यालये, विभागीय क्रीडा संकुल अशा अनेक सुविधा गावामध्ये राबविण्याचे कामही केलेले आहेत. तसेच सभापती पदापासून आमदारकीपर्यंत अनेक विकास कामे करून गावाचा चेहरामोहरा बदलण्याचे काम केले. त्यामुळे जुन्या उस्मानाबादमधील भांडखोर असणार्या कव्हा गावाला आता तंटामुक्तीचे पाच लाखाचे पारितोषिक मिळाले तर कव्हा गावाला आदर्श ग्रामचे वीस लाखाचे पारितोषिक मिळालेले आहे. गावातील विकास कामामुळे कव्हा गावाला भेटी देणार्या लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे यापुढील कालावधीतही विकासाच्या माध्यमातून कव्हा गाव महाराष्ट्रात क्रमांक एकवर आणण्याचे काम करू असे प्रतिपादन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

यावेळी ते भाजपा नेते तथा माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाला एमएनएस बँकेचे उपाध्यक्ष एसआर मोरे, व्यंकटेश हालिंगे, प्रा.अशोक पाटील, कव्हा गावचे माजी सरपंच नेताजी मस्के, डॉ

एजाज बिराजदार, अच्युत पाटील, मच्छिंद्र गुरमे, मुख्याध्यापिका अरुणा कांदे, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सुनिता मुचाटे, स्वामी निरुपानंदजी, कापसे, गिरी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले, निश्चित ध्येय असेल तर कुठलेही काम मार्गी लावता येते. आज देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचे वय ७२ वर्ष आहे.



राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरदचंद्रजी पवार यांचे वय ८२ वर्ष आहे. तरीही तरूणाला लाजवेल असे काम ते करतात. मीही दररोज सकाळी भगवान शंकराची पुजा करतो. महात्म्यांच्या विचाराचे जतन करून त्याच विचारावर वाटचाल करण्याचे काम सुरू आहे. राष्ट्रसंत मुरारी बापू म्हणतात आचार, आहार, विचार, अंगत विहार असणारा तो खरा साधू यांच्या सहवासात राहून आध्यात्मिक विचाराने वाटचाल सुरू आहे. भारतीय संस्कृतीमध्ये माता-पित्यापेक्षा गुरूंना मोठे स्थान आहे. त्यांनी केलेल्या संस्कारावर विद्यार्थ्यांची वाटचाल सुरू राहते. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन कारकुनी शिक्षणपध्दती बंद करून सीबीसीएस शिक्षण पध्दत सुरू करण्याचे काम केले. या माध्यमातून मध्य प्रदेशातील शिक्षणामध्ये भगतव्गितेचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामुळे मध्यप्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रातील शिक्षणातही भगवत्गिता, कुराण व बायबलचा समावेश करावाअशी अपेक्षाही त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख मान्यवरांच्याहस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रारंभी शाळेतील विद्यार्थ्यांना साहेबांच्या वाढदिवसानिमित्त फळे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका अरुणा कांदे यांनी केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रमोद मोकाशे यांनी केले. यावेळी या कार्यक्रमाला प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचार्यासह विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

आपल्या शुभेच्छा व आशीर्वादावर आयुष्यभर लढण्याचे काम करू

जेजे नवं ते कव्ह्याला हवं या उक्तीनुसार कव्हा गावामध्ये सर्व योजना राबवून कव्हा या गावचा चौफेर विकास करण्याचे काम आपण केलेले आहे. जिल्हा परिषद अध्यक्षपदी सौ.प्रतिभा कव्हेकर असताना कव्हा गावामधून अनेक शेतकर्यांना सिंचन विहीरी तसेच अनेक शेतकर्यांना गाय गोठा देण्याचे कामही केलेले आहे. याबरोबरच रस्ते नाले व इतर विकास कामासाठीही जिल्हा परिषदेच्या माध्यमातून निधी देऊन दिलेल्या गावाचा विकास साधण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे आपण वाढदिवसानिमित्त दिलेल्या शुभेच्छा व आशीर्वादावर आपल्यासाठी आयुष्यभर लढण्याचे काम करू असे प्रतिपादन माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

# 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजना अर्जदारांच्या पहिल्या यादीच्या चावडी वाचनाची कार्यवाही पूर्ण



लातूर, / प्रतिनिधी- जिल्ह्यात 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेसाठी अर्ज भरून घेण्याची कार्यवाही गतीने सुरु असून या योजनेसाठी प्राप्त अर्जांच्या पहिल्या यादीचे चावडी वाचन आज (ता. १३) जिल्ह्यातील सर्व शहरी व ग्रामीण भागात करण्यात आले. यामध्ये अर्जदाराचे नाव, त्यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची माहिती देण्यात आली. जिल्हास्तरीय आणि तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी विविध ठिकाणी या चावडी वाचन उपक्रमाला भेट दिली.

'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेतून अडीच लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबातील महिलांना दरमहा १ हजार ५०० रुपयांचा लाभ दिला जाणार आहे. या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक असून अर्ज सादर करण्यासाठी 'नारीशक्ती दूत' हे मोबाईल प कार्यान्वित करण्यात आले आहे. जिल्ह्यात आयोजित शिबिरांच्या माध्यमातून विहित नमुन्यातील ऑफलाईन अर्ज आणि आवश्यक कागदपत्रे स्वीकारून हे अर्ज ऑनलाईन केले जात आहे.

ऑनलाईन करण्यात आलेल्या अर्जदारांच्या यादीचे गावनिहाय चावडी वाचन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार लातूर जिल्ह्यात दर शनिवारी आणि बुधवारी चावडी वाचनाचे नियोजन करण्यात आले आहे. आतापर्यंत प्राप्त अर्जांच्या पहिल्या यादीचे चावडी वाचन शहरी व ग्रामीण भागात करण्यात आले. तलाठी, ग्रामसेवक, कृषि सहायक, अंगणवाडी सेविका, ग्राम रोजगार सेवक, आशा सेविका यांच्यासह अन्य ग्रामस्तरीय कर्मचारी यांनी ग्रामीण भागात, तर शहरी भागात अंगणवाडी सेविका, आशा सेविका यांच्यासह महानगरपालिका प्रशासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी यादी वाचनाची प्रक्रिया पूर्ण केली. यावेळी उपस्थित करण्यात आलेले आक्षेप नोंदविण्यात आले असून शासन निर्णयानुसार त्यावर पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी जावेद शेख यांनी औसा तालुक्यातील आलमला येथील चावडी वाचनास उपस्थित राहून मार्गदर्शन केले. सहायक गट विकास अधिकारी महेंद्र कुलकर्णी यावेळी उपस्थित होते. तसेच उदगीर नगरपरिषदेच्यावतीने आयोजित चावडी वाचनास मुख्याधिकारी सुंदर बोंदर हे उपस्थित होते. तसेच जिल्ह्यात इतर ठिकाणीही तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी चावडी वाचन उपक्रमास भेट देवून कामकाजाची पाहणी केली. ग्रामीण भागातील चावडी वाचनास विविध गावांचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्यही उपस्थित होते.

# लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज स्वीकृती केंद्र सुरू

## शहरातील महिलांनी लाभ घ्यावा आयुक्त बाबासाहेब मनोहरे

लातूर/प्रतिनिधी :शासनाच्या वतीने राज्यातील महिलांचे आरोग्य व पोषण आणि यांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यानुसार राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी शासनामार्फत मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आलेली आहे.

या योजनेचा लाभ शहरातील पुढीलप्रमाणे पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या महिलांना अर्ज करता येतो. यात महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ वर्षे वयोगटातील विवाहित, विधवा, घटस्फोटीत, परित्यक्त्या आणि निराधार महिला तसेच त्या कुटुंबातील केवळ एक अविवाहित मुलगी, यासाठी त्या महिलेचे आधार कार्ड, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र आवश्यक आहे ते नसल्यास त्या ऐवजी त्या महिलेचे १५ वर्षापूर्वीचे रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र व जन्म दाखला या पैकी कोणतेही एक कागदपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र किंवा रेशन कार्ड, बँक खातेचे पास बुक व एक पासपोर्ट फोटो अर्ज भरण्यासाठी आवश्यक आहेत. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २ लक्ष ५० हजार पेक्षा जास्त आहे अशा कुटुंबातील महिला पात्र असणार नाहीत. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महानगरपालिका क्षेत्रात अर्ज स्वीकृती केंद्र स्थापन करण्यात आली आहेत या केंद्रावर कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. त्याची यादी पुढीलप्रमाणे शहरातील क्षेत्रीय कार्यालय ए मध्ये काशी महादेव मंदिर विशालनगर, मारोती मंदिर सूळ नगर, नागरी आरोग्य केंद्र सुभेदार रामजी नगर, पाण्याची टाकी बार्शी रोड, बौद्धविहार विक्रमनगर, बालाजी मंदिर हडको कॉलनी, मनपा शाळा क्र. २४ विकास नगर, बौद्धविहार न्यू भाग्य नगर, कुलस्वामिनी मंदिर कुलस्वामिनी नगर, नालंदा बौद्धविहार प्रकाश नगर, वाले इंग्लिश स्कूल खाडगाव रोड, मनपा मंगल कार्यालय खणी भाग, पाण्याची टाकी सरस्वती कॉलनी, राधा कृष्ण मंदिर दादोजी कोंडदेव नगर, क्षेत्रीय कार्यालय बी मध्ये दक्षिणमुखी हनुमान मंदिर लमाण तांडा, क्षेत्रीय कार्यालय बी ठाकरे चौक, विठ्ठल रुक्मिणी मंदिर कन्हेरी रोड, लाल बहादूर शाळा जुना औसा रोड, श्री श्री रविशंकर शाळा गोपाळ नगर, राजनंदिनी शाळा गोपाळ नगर, विठ्ठल रुक्मिणी मंदिर माताजी नगर, राम मंदिर पटेलनगर, मिनार उर्दू स्कूल हनुमान मंदिर नंदनवन कॉलनी, विठ्ठल रुक्मिणी मंदिर मजगे नगर, क्षेत्रीय कार्यालय सी मध्ये सिद्धार्थ समाजमंदिर संजयनगर, साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे सभागृह राजीवनगर, बौद्धविहार समाजमंदिर इंदिरानगर, बौद्धविहार आनंदनगर, भोई समाजमंदिर तुळजाभवानी नगर, प्रियदर्शिनी समाजमंदिर लेबर कॉलनी, समाजमंदिर सम्नाट चौक, समाजमंदिर संजयनगर, समाजमंदिर संत गोरोबा सोसायटी, मनपा शाळा जुनी यशवंत शाळा साळे गल्ली, मनपा शाळा क्र. ९ मंठाळे नगर, मनपा शाळा क्र. ३ बादाडे नगर, मनपा शाळा क्र.३ सोफिया मस्जिद, मनपा शाळा क्र. २६ मिलिंद शाळेजवळ, मनपा शाळा क्र. ५ आनंदनगर, मनपा शाळा क्र. ५ राजीव नगर, क्षेत्रीय कार्यालय सी, क्षेत्रीय कार्यालय डी मध्ये चर्मकार समाजमंदिर साळे गल्ली, ढोर समाजमंदिर सिद्धेश्वर चौक, अण्णा भाऊ साठे समाजमंदिर विलासनगर, काशीनाथ समाजमंदिर वैदू वस्ती, रमाबाई माता समाजमंदिर रमाबाई नगर, यशवंत शाळा नांदेड रोड, पूर्णानंद मंगल कार्यालय खोरी गल्ली, मनपा शाळा क्र. २८ केशवनगर, मनपा शाळा क्र. ३२ बरकत नगर, भदंत महाथेरो चंद्रमुनी बौद्धविहार गवळीनगर, शहरातील सर्व नागरी आरोग्य केंद्र, मनपा DAY-NULM शहर अभियान व्यवस्थापन कक्ष रूम नंबर ११ या ठिकाणी करण्यात आली आहे.

तरी शहरातील जास्तीत जास्त पात्र महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

## जनरल द्विवेदींनी सीमेवरील परिस्थितीचा घेतला आढावा

दिमापूर : जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी ३० जून रोजी लष्करप्रमुख म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर ईशान्येचा पहिला दौरा केला. यावेळी त्यांनी अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीममधील चीन सीमेवरील सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेतला. आपल्या दोन दिवसांच्या दौ-यात जनरल द्विवेदी यांनी दिमापूर येथे मुख्यालय असलेल्या २ कॉर्प्ससह पूर्व लष्करी कमांडच्या अंतर्गत सर्व कॉर्पस् फॉर्मेशनला भेट दिली. यादरम्यान, त्यांना मणिपूरमधील सद्य परिस्थितीबद्दल माहिती देण्यात आली, जिथे गेल्या एक वर्षापासून मोठ्या प्रमाणावर जातीय हिंसाचार झाला आहे.

लष्कराच्या एका अधिका-याने सांगितले की, गुरुवारी त्यांच्या दौ-याच्या सुरुवातीला लष्करप्रमुख द्विवेदी तेजपूर येथील गजराज ४ कॉर्प्समध्ये पोहोचले, या ठिकाणी त्यांना चीनसोबतच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील सद्य परिस्थिती आणि तेथील ऑपरेशनल तयारीबद्दल माहिती देण्यात आली. यानंतर सुकना येथील ३३ कॉर्प्स मुख्यालयाच्या भेटीदरम्यान लष्करप्रमुखांनी सिक्कीममध्ये सुरू असलेल्या पायाभूत सुविधांच्या विकास प्रकल्पांचाही आढावा घेतला. या दौ-यात लष्करप्रमुखांसोबत पूर्व लष्कराचे कमांडर लेफ्टनंट जनरल आर. सी. तिवारी होते.

# उद्धवराव पाटील म्हणजे तत्वनिष्ठ निस्पृह राजकारणी :लोमटे



धाराशिव (प्रतिनिधी) - शेतकरी, कष्टकरी व श्रमिकांसाठी जीवनभर लढणारे भाई उद्धवराव पाटील विरोधी पक्ष नेते होते. त्यांना मुख्यमंत्री पदाची संधी मिळाली असतानाही पक्ष निष्ठेने त्या पदाचा त्याग केला. त्यामुळे आजच्या दलबदलू राजकीय पुढाऱ्यांनी आदर्श घ्यावा असे तत्वनिष्ठ निस्पृह राजकारणी म्हणजे भाई उद्धवराव पाटील होते असे मत हभप पांडुरंग लोमटे महाराज यांनी व्यक्त केले.

झुंजार सेनानी भाई उद्धवराव पाटील यांच्या ४० वी पुण्यतिथी निमित्त छत्रपती शिवाजी हायस्कूल येथे शुक्रवारी सकाळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्रारंभी झुंजार सेनानी भाई उद्धवराव पाटील यांच्या पुतळ्यास उपस्थितांच्या हस्ते पुष्पांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजर्षी शाहू शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्षा शशिकलाताई घोगरे हे होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील, महादेव गवाड, तेरणा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष बाळासाहेब पाटील, महिला सबलीकरणाच्या सदस्य रेखा जगदाळे, संस्थेचे कार्याध्यक्ष एम.डी. देशमुख, उपाध्यक्ष ॲड. अविनाशराव देशमुख, सचिव भाई धनंजय पाटील, उषाताई देशमुख, रंगनाथ खोचरे, प्राचार्य पी.एन. पाटील, उपप्राचार्य एस.पी. मुंडे, पर्यवेक्षक व्ही.के. देशमुख, पर्यवेक्षक अमोल दिक्षित व मुख्याध्यापक कचरू घोडके आदी उपस्थित होते.

सामन्यांतील असामान्य व्यक्तिमत्त्व असलेल्या उद्धवराव दादांच्या संस्कारांनी आपल्या आयुष्याला कसे संस्कारित केले. हे त्यांच्यासोबतच्या अनेक प्रसंगाना उजाळा देत एम.डी. देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर भाई उद्धवराव दादांनी सामाजिक, राजकीय काम करत असताना तळागाळातील लोकांसाठी आपले स्वतःचे संपूर्ण जीवन वाहून घेतले होते असे अध्यक्षिय मनोगतात शशिकलाताई घोगरे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य पाटील यांनी तर सूत्रसंचालन सुहासिनी जाधव व ज्योत्स्ना बनजगोळे यांनी व आभार पर्यवेक्षक अमोल दिक्षित यांनी मानले. या कार्यक्रमास नागरिक, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना**

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

९% आवर्त ठेव द.सा.द.शे, ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागू.



यशवंत
रविवार दि. १४ जुलै २०२४
उदगीर
पान ८
कार्यालय :०२३८५-२५३१९८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com

**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**
शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरीक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

उपलब्ध सुविधा
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग

# 'स्टडी फ्रॉम होम' करीतच ईशा झाली सी.ए.



**उदगीर (प्रतिनिधी)** जिद्द आणि मेहनतीच्या बळावर घरीच राहून ऑनलाईन शिक्षण घेत यश मिळवता येते हे उदगीरच्या ईशाचे चिद्दरवार हिने सिद्ध केले. मे २०२४ ला झालेल्या सीएच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन आता सीए बनलेली इशा आपल्या यशाचे श्रेय कुटुंबीयांना देते.

उदगीरच्या महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. दीपक चिद्दरवार व सौ .आदिती चिद्दरवार यांची कन्या कुमारी ईशाने दहावीत ९५ टक्के गुण मिळवूनही वेगळी वाट चोखाळण्याचा निर्णय घेतला . तिच्या या निर्णयाला कुटुंबाने पाठिंबा दिला .

लातूरच्याराजर्षी शाहू महाविद्यालयात वाणिज्य शाखेचे शिक्षण घेतानाच तिची सीए ची जडणघडण झाली . यानंतर ईशाने मागे वळून पाहिलेच नाही . सीए परीक्षेत यशस्वीतेचे प्रमाण फक्र्ार कमी असताना तिने हे यश मिळविले आहे .आई वडील व भावाने दिलेला पाठिंबा यामुळे हे मिळाल्याचे ईशाने सांगितले . अतजझअ(आर्य वैश्य ऑफिफ्रशियल अँड प्रोफफेशनल असोसिएशन उदगीर) च्या वतीने ईशाचा महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य धनंजय गुडसूरकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला .यावेळी अव्हपाचे अध्यक्ष प्रा .संजय चन्नावार ,सचिव विजय गबाळे,उपाध्यक्ष संजय पत्तेवार यांच्यासह अव्हापाचे सदस्य पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी गुडसूरकर,प्रा. प्रमोद पारसेवार ,प्रा संजय संगुळगे, विजय गबाळे, डॉ . दीपक चिद्दरवार यांनी मनोगत व्यक्त केले. कु. ईशा चिद्दरवार हिने सत्काराला उत्तर देताना कठोर परिश्रम हाच यशाचा पाया असल्याचे सांगितले. अभ्यास करताना तणाव न घेता वेळेचे नियोजन करून तणाव न घेताही यश मिळाल्याचे ईशाने सांगितले .

याप्रसंगी संजय पत्तेवार, बालाजी बुन्नावार, संतोष कोटगिरे , एडवोकेट बालाजी जगळपुरे, सुहासिनी सुरशेटवार, मंजुषा चन्नावार, रूपाताई गुडसुरकर, पद्मा कोटगिरे, अर्चना बुन्नावार, सरस्वती पत्तेवार , मेघा संगुळगे आदिती चिद्दरवार या सर्वांनी कौतुक केले.

# उदगीर- जळकोट मतदारसंघातील भाजपा कार्यकर्ते पक्षासोबत ठाम - शिवानंद हैबतपूरे

**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर जळकोट विधानसभा मतदारसंघ हा कायम भाजपाचा बालेकिल्ला असून पक्षाच्या कार्यकर्त्यांनी अत्यंत परिश्रम करुन हा मतदारसंघ बांधला आहे. गत पंचवीस वर्षापासून या मतदारसंघात भाजपा विचाराची पेरणी असंख्य निस्वार्थ अशा कार्यकर्त्यांनी केली म्हणूनच भाजपाने या मतदारसंघात वेळोवेळी आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. अशा परिस्थितीत कोणी पक्ष सोडून गेले असले तरी भाजपा कार्यकर्ते हे कायम पक्षाच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहातील असा विश्वास भाजपा प्रदेश प्रवक्ते शिवानंद हैबतपूरे यांनी व्यक्त केले.



उदगीरचे माजी आमदार व भाजपा नेते सुधाकर भालेराव यांनी भाजपाला सोडचिठ्ठी देऊन शरद पवार गटात प्रवेश केला. त्या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत बोलताना हैबतपूरे म्हणाले की भारतीय जनता पार्टी हा व्यक्तीकेंद्रित पक्ष नसून तत्वकेंद्रित पक्ष आहे. भारतीय संविधानाचे जतन करण्यासाठी व बलशाली राष्ट्र निर्माणासाठी भाजपाला सतत संघर्ष करत रहावे लागले आहे. संघर्ष हा भाजपाच्या वाट्याला नेहमीच आला आहे आणि हा संघर्ष करुनच कार्यकर्त्यांनी जनमताचा विश्वास प्राप्त केला आहे. भाजपाने अनेक सामान्य कार्यकर्ते मोठे केले, छोट्या छोट्या जातीसमूहांसाठी काम केले. अनेकांना न्याय दिला पण काही लोक याची जाणीव न ठेवता पक्षाला सोडून गेले.

असं असले तरी भाजपा कायम एकसंध राहिला. गत लोकसभा निवडणुकीत प्रियंका गांधीची सभा होऊनही भाजपाने उदगीर-जळकोट मध्ये मताधिक्य घेतले हे लक्षात घेणे आवश्यक आहे. भाजपा नेत्यांचा नव्हे तर कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. म्हणूनच उदगीर-जळकोट विधानसभा मतदारसंघात कोणाच्या जाण्याने भाजपावर कुठलाही परिणाम होणार नसून मतदारसंघातील जनता आणि कार्यकर्ते हे भाजपा सोबत ठामपणे उभे असल्याचे प्रदेश प्रवक्ते शिवानंद हैबतपूरे यांनी सांगितले.

या बैठकीला उपस्थित आपल्या मनोगतात बोलताना भाजपा जिल्हा अध्यक्ष दिलीपराव देशमुख म्हणाले की भाजपा ने ज्यांना दोनवेळा आमदार केले त्यांनी याची जाणीव न ठेवता पक्षांतर केला. याची मतदार नक्कीच नोंद घेऊन त्यांना त्यांची जागा जनता दाखवून दिल्याशिवाय रहाणार नसल्याचे जिल्हा अध्यक्ष दिलीप देशमुख यांनी सांगितले.

भाजपा नेते बसवराज बागबंदे आपल्या मनोगतात बोलताना म्हणाले की उदगीर भाजपा ही एकसंघ असून भाजपाने माझ्या सारख्या सामान्य कार्यकर्त्याला या उदगीर नगरपरिषदेच्या अध्यक्षपदी काम करण्याची संधी दिली. उदगीरच्या विकासासाठी भाजपाने आपला सिंहाचा वाटा उचलला आहे. याची आम्हाला जाणीव असून आम्ही भाजपाशी एकनिष्ठ आहोत.

उदगीर तालुका अध्यक्ष शिवशंकर धुप्पे म्हणाले की तालुक्यातील भाजपा ही कायम तत्ववर चालली आहे. ती माणसाशी नसून विचाराशी बांधिल आहे. तालुक्यातील चारदोन लाभार्थी गेले असले तरी निष्ठावान लोकांची फळी ही भाजपा सोबत आहे.

भाजपा उदगीर शहराध्यक्ष मनोज पुदाले म्हणाले की उदगीर शहराने इथल्या स्थानिक पातळीवर अगदी प्रत्येक बुथावर ताकतीने काम केले आहे. इथला प्रत्येक बुथप्रमुख आणि वॉर्ड प्रमुख हा आज समर्पित भावनेने भाजपासोबत असून सुधाकर भालेराव यांच्या पक्षांतराचा कुठलाही परिणाम होणार नाही.

लातूर जिल्हा युवा मोर्चा अध्यक्ष अमोल निडवदे म्हणाले की भाजपात केवळ विचारांचा जागर होत असतो. माणसापेक्षा विचारांना महत्त्व देणारा कार्यकर्ता हीच भाजपाची शक्ती असल्याचे निडवदे यांनी सांगितले. याप्रसंगी उदगीर शहर व तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांनी आपली उपस्थिती नोंदवली.

# हिंदू - मुस्लीम ऐक्याचं प्रतिक असलेल्या मोहरम ताजीय सवाऱ्याची उत्साहात स्थापना..!

**जळकोट (प्रतिनिधी)** शहरातील लोहार गल्ली येथील लोहार देवस्थानाची प्रतिष्ठापणा मंगळवार दि ९ जुलै रोजी करण्यात आली आहे . त्या प्रमाणे दि ०९ जुलै ते १७ जुलै २०२४ या तारखे दरम्याण २ ते ३ वेळा हा उत्सव साजरा करण्यात येणार आहे हा उत्सवा मोठ्या थाटामाटात उत्साहात व जयघोषात तल्लीन होऊन हिंदू -मुस्लिम बांधव एकत्रित येऊन साजरा करतात .

प्रतिवर्षा प्रमाणे याहीवर्षी मोहरम ताजीया या उत्सवाची सुरुवात झाली आहे मुख्यातः शनिवार दि १३ जुलै रोजी सहावी आसुन रविवार दि १४ जुलै रोजी ७ वी ह्या उत्वाची सुरुवात होणार आसुन लालसाहेब व दर्णालसाहेब ही सवारी मुळ स्थानावरुन पहाटे २ च्या दरम्याण उठवली जाते व गावातील सर्व मोहरम देवस्थानास भेट देऊन मुळ ठिकाणी सकाळी ७च्या दरम्याण बसवली जाते . तसेच बुधवार दि १७ रोजी पहाटे २ वाजता सवारी मुळ ठिकाणाऊन उठवली जाते व संध्याकाळी १० वाजेपर्यंत हा उत्सव साजरा केला जातो त्या दिवशी संपूर्ण शहरभर या सवाऱ्याची मिरवणूक मोठ्या उत्साहात काढली जाते व हालकीच्या घाईत वाजत गाजत हा उत्सव साजरा केला जातो. यात लालसाहेब व दर्नालसाहेब असे दोन सवाऱ्याचे स्वरुप आसते तर दोन मवलाली ही यात आसते या दहा दिवसांच्या या कालावधीत सहावी , सातवी , नववी , आणि दहावी असे तिन टप्यात हा उत्सव साजरा केला जातो .

हिंदू व मुस्लिम बांधव एकत्रितपणे येऊन हा उत्सव साजरा करण्यासाठी एकत्रित येतात या मोहरमला हिंदू - मुस्लिम ऐक्याचं प्रतिक असेही संबोधण्यात येते . या उत्सवातून जळकोट शहरासह तालुक्यातील सर्व जाती धर्मातील जनतेला एकाच धर्मात बांधण्याचे काम केले जाते . दोन समाजामधील दुजाभाव दूर करुन मनोमिलन करणे हा एकमेव उद्दात हेतू या मोहरम उत्सवाचा आसतो तसेच शांती , संयम , बंधुप्रेम , सर्वधर्म समभाव ह्या या उत्सवात दिसून येतात एकंदरीत हा उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जाणार आहे . त्यामुळे शहरासह परिसरातील सर्व नागरीकांनी या उत्सवात येऊन आनंद उत्सव साजरा करावा असे लोहार देवस्थानाचे मुख्य बाबा कळसे यांचे वंशज धोंडिबा बाबा कळसे यांचे चिरंजीव लोहार देवस्थानाचे मुख्य व्यवस्थापक /अध्यक्ष तुकाराम धोंडिबा कळसे , प्राचार्य चंद्रशेखर कळसे , ज्ञानोबा कळसे, ॲड . अमोल कळसे , माधव कळसे , अशोक कळसे , संजय खंदारे , जेष्ठ नागरिक गणपत तिलमलदार , सेक्रेटरी बालाजी तिलमलदार , माधव चिखले , देवकर ईस्माईल बागवान , महेबुब बागवान यांच्यासह जळकोट तालुका मराठी पत्रकार संघ , व्हाईस ऑफ्र मिडिया , महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ जळकोट , तालुका विधिज्ञ संघ जळकोट ,लोहार गल्ली यासह जळकोट शहर वासीयांनी केले आहे.



### लोहार देवस्थानाची शेकडो वर्षाची परंपरा कायम

खरे तर जळकोट शहराला मोहरम ताजिया या उत्सहाची अनेक वर्षांची परंपरा आहे . जळकोटसह उदगीर , देवणी , निलंगा , लातूर , अहमदपूर आणि नांदेड जिल्ह्यातील श्रद्धाळू या उत्सवात सहभागी होतात . व उत्सव पहाण्यासाठी येतात जळकोट येथील उत्सवाचे प्रमुख व मुख्य संस्थापक बाबा कळसे यांच्या पूर्वजांनी ही परंपरा लोहारगल्ली जळकोट येथे सुरु केली होती. त्यानंतर त्यांचे वंशज मोठे चिरंजीव कै. धोंडिबा बाबा कळसे यांनी या परंपरेचा वारसा पुढे चालवला आणि त्या नंतर त्यांचे चिरंजीव लोहार देवस्थानाचे मुख्य व्यवस्थापक / अध्यक्ष तुकाराम धोंडिबा कळसे हे आपल्या पूर्वजाची वारसा व परंपरा पुढे चालवण्याचं काम करीत आहेत अशा प्रकारे या लोहार देवस्थानाचा इतिहास आहे. तो आजही कायम आहे .

# बस खाली चिरडून महिला ठार; हाळी गावाजवळील घटना

**हाळी हंडरगुळी (प्रतिनिधी)** हाळी ते रुद्रवाडी रस्त्यावर मोटरसायकल स्लीप होऊन झालेल्या अपघातात महिला बस खाली चिरडून जागीच ठार झाल्याची घटना शुक्रवारी सायंकाळी साडे सहा वाजण्याच्या घडली. उज्वलाबाई हरिश्चंद्र भुरकापल्ले वय ४५ वर्षे रा. येणगेवाडी असे मृत महिलेचे नाव आहे.

याबाबतपोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, राज्य परिवहन महामंडळाची बस क्रमांक एम एच ४० एन ९१८६ शुक्रवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास चाकूर वरून बोरगाव मार्गे हाळी कडे येत होती. दरम्यान हाळी हून येनगेवाडीकडे मोटरसायकल वरून उज्वलाबाई नातेवाईका समवेत जात होते .दरम्यान हाळी गावाजवळ मोरतळे यांच्या धाब्या समोर वळणावर पाऊस पडल्याने मोटरसायकल स्लीप झाल्याने गाडीवर पाठीमागे बसलेली महिला रस्त्यावर पडताच समोरून बस आली. त्यामुळे बसच्या चाकाखाली सदर महिला चिरडली गेली. यात महिलेचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पो. हे. कॉ. संजय दळवी, पो. कॉ. कसबे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. रात्री उशिरापर्यंत गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होती.



संभाजी नगर येथील सौ. सुमन (जया) व श्री. माणिक विश्वनाथप्पा निला यांचे चि. शुभम यांचा शुभविवाह हेर ता.उदगीर येथील सौ. संगीता व प्रभु नागनाथप्पा कडोळे यांची कन्या चि.सौ.कां.दिव्या यांचा शुभविवाह उदगीर येथे ललित भवन मंगल कार्यालयात संपन्न झाला

यावेळी वधुवरांना शुभाशिर्वाद व भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देताना हावगीस्वामी महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे प्राध्यापक शिवराज होनकर, महाविद्यालयीन वर्गमित्र अशोक कापसे, राम मोतीपवळे, औम प्रकाश रेड्डी, संतोष पाठक, सुधन पाटिल, अनिल हळ्ळे, प्रा.ह.वा.कुलकर्णी विवेक स्वामी, जगन्नाथ भंडारे, प्रकाश सदानंदे, रवी मलगे, नगर सेविका बस्वकल्याण निर्मला (कडगे) शिवंकर, ज्योती माका (पांडे), सुनंदा मलगे, सविता कोळसे पाटिल (जाधव), पुष्पलता बिरादार व मित्र परिवार उपस्थित होते.

# मैत्री प्रशिक्षणांमधून कौशल्यवृद्धीसह पशुपालक आणि तरुणांची आर्थिक उन्नती शक्य : डॉ. अनिल भिकाने

**उदगीर (प्रतिनिधी)** मैत्री प्रशिक्षणांमधून कौशल्यवृद्धी करुन पशुपालकाचे उत्पन्न वाढ आणि तरुणांना नवीन व्यवसाय संधी शक्य असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे संचालक, विस्तार शिक्षण डॉ. अनिल भिकाने यांनी केले. ते मराष्ट्रीय गोकुळ मिशनफ अंतर्गत महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर; पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने पशुप्रजनन व स्त्रीरोगशास्त्र विभाग, पशुवैद्यकीयमहाविद्यालय, उदगीर येथे आयोजित ग्रामीण भारतासाठी बहु-उद्देशीय कृत्रिम रेतन तंत्रज्ञ ( मैत्री) प्रशिक्षण कार्यक्रमातील प्रशिक्षणार्थींच्या मार्गदर्शनपर कार्यक्रमात बोलत होते. पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.नंदकुमार गायकवाड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ.अशोक देवगरे आणि डॉ. अनिल पाटील, प्रकल्प सह-समन्वयक उपस्थित होते.

डॉ. अनिल पाटील यांनी प्रास्ताविकामध्ये दि. २४ जून ते २३ जुलै २०२४ दरम्यान राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमाची रुपरेषा सांगितली. सदर प्रशिक्षण कार्यक्रमातून कृत्रिम रेतन विषयक जास्तीत जास्त ज्ञान घेवून त्याचा पशुधनातील गर्भधारणा दर वाढवण्यासाठी वापर करावा असे मत डॉ. नंदकुमार गायकवाड



यांनी व्यक्त केले. आपल्या मार्गदर्शनात पुढे डॉ. अनिल भिकाने यांनी तरुणांनी दुधाळ जनावरांमध्ये कृत्रिम रेतन करून शुद्ध वंशावळी व अधिक दूध देणारे पशुधन निर्माण करण्यासाठी कुशल व तांत्रिक मनुष्यबळ तयार करणे हे या प्रशिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे सांगितले. तसेच प्रशिक्षण कालावधीत कृत्रिम रेतन तंत्रज्ञानाबरोबरच पशुपालनव्यवस्थापनाबाबत जास्तीत जास्त ज्ञान आत्मसात करून पशुपालकांच्या उत्थानाबरोबरच स्वतःचा आर्थिक विकास साधावा असे प्रतिपादन केले. या प्रशिक्षणामध्ये नांदेड व धाराशीव जिल्ह्यातील ३० सुशिक्षित बेरोजगार तरुण सहभागी झाले आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशिक्षण सहसमन्वयक डॉ.प्रफुल्लकुमार पाटील तर आभार प्रदर्शन डॉ. स्नेहल रामटेके यांनी केले. यावेळी प्रशिक्षणार्थी आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.